**अर्थसंकल्प 2021-2022**

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अर्थसंकल्पीय भाषण**

**1 फेब्रुवारी 2021**

## अनुक्रमणिका

### भाग-अ


| | पृष्ठ क्र. |
|---|---|
| • परिचय | 1 |
| • आरोग्य आणि स्वास्थ्य | 5 |
| • भौतिक आणि आर्थिक भांडवल आणि पायाभूत सुविधा | 7 |
| • महत्वाकांक्षी भारतासाठी सर्वसमावेशक विकास | 19 |
| • मानवी भांडवलाचे पुनरुज्जीवन | 22 |
| • नवशोधन, संशोधन आणि विकास | 23 |
| • किमान सरकार आणि कमाल शासन | 24 |
| • वित्तीय स्थिती | 25 |


### भाग- ब


**प्रत्यक्ष कर प्रस्ताव** 28

- ज्येष्ठ नागरिकांना दिलासा
- आयकर प्रक्रियेसाठीच्या वेळेत कपात
- वाद निराकरण समितीची स्थापना
- चेहराविरहीत आयकर आकारणी
- अनिवासी भारतीयांना दिलासा
- लेखा परीक्षणातून सूट

- लाभांशासाठी दिलासा
- पायाभूत सुविधा क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला आकर्षित करणे
- परवडण्याजोग्या घरांची निर्मिती / भाडेतत्वावरील घरे
- आयएफएससी अर्थात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रासाठी कर सवलत
- परतावा पूर्व भरणा
- लहान विश्वस्त निधींना दिलासा
- कामगार कल्याण

**अप्रत्यक्ष कर प्रस्ताव** 33

- वस्तू आणि सेवा कर
- सीमा शुल्क सुसूत्रीकरण
- इलेक्ट्रॉनिक्स आणि मोबाईल फोन उद्योग
- लोखंड आणि पोलाद
- वस्त्रोद्योग
- रसायने
- सोने आणि चांदी
- नवीकरणीय उर्जा
- भांडवल उपकरणे
- एमएसएमई उत्पादने
- कृषी उत्पादने

**परिशिष्ट**

**भाषणाच्या भाग अ चे परिशिष्ट** 37

- आरोग्य आणि स्वास्थ्य – खर्च
- पथदर्शी प्रकल्प: रस्ते आणि महामार्ग
- निर्गुंतवणुक/ धोरणात्मक निर्गुंतवणूक धोरणातील मुख्य मुद्दे
- कृषी उत्पादनांची कमाल हमी भावाने खरेदी
- राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा भाग म्हणून शिक्षणासंबंधी उपक्रम
- अर्थसंकल्पेतर स्रोतांचे विवरण

(सरकारी रोखे, एनएसएसएफ कर्ज आणि इतर स्रोत)

**भाषणाच्या भाग ब चे परिशिष्ट** **45**

**प्रत्यक्ष कर**

**अप्रत्यक्ष कर**

# **अर्थसंकल्प 2021-2022**

## ***निर्मला सीतारामन यांचे अर्थसंकल्पिय भाषण***

*अर्थमंत्री*

## **1 फेब्रुवारी 2021**

माननीय सभापती महोदय,

**मी सन 2021-2022 चा अर्थसंकल्प सादर करते.**

**परिचय**

**1.** माननीय सभापती महोदय, यापूर्वी कधीही अशा प्रकारच्या परिस्थितीत अर्थसंकल्प तयार करावा लागला नव्हता. एखाद्या देशावर किंवा देशातील एखाद्या क्षेत्रावर ओढवणाऱ्या आपत्तींची आम्हाला कल्पना आहे, मात्र 2020 या वर्षभरात कोविड - 19 प्रादुर्भावाच्या काळात आपण जे काही सोसले, ते अभूतपूर्व असेच होते.

**2.** जेव्हा मी 2020-21 चा अर्थसंकल्प सादर केला होता तेव्हा आधीपासूनच मंदीच्या गर्तेत असणारी जागतिक अर्थव्यवस्था इतक्या मोठ्या प्रमाणात आकुंचित होईल, अशी कल्पनाही आम्ही केली नव्हती.

**3.** इतर देशांतील लोकांप्रमाणेच आमच्या देशातील नागरिकांनाही आपल्या प्रियजनांना गमवावे लागेल आणि या साथरोगामुळे उद्भवलेल्या बिकट परिस्थितीमुळे इतका त्रास सहन करावा लागेल, अशी कल्पनाही आम्ही केली नव्हती.

**4.** टाळेबंदी लागू न करण्यामुळे जास्त धोका संभवत होता. तीन आठवड्यांची संपूर्ण टाळेबंदी घोषित केल्यानंतर अवघ्या 48 तासांत पंतप्रधानांनी 2.76 लाख कोटी रुपयांची तरतूद असणारी प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना जाहीर केली. या योजनेंतर्गत 800 दशलक्ष लोकांना मोफत अन्नधान्य तर 80 दशलक्ष कुटुंबांना स्वयंपाकाचा गॅस मोफत उपलब्ध करुन देण्यात आला. त्याचबरोबर शेतकरी, महिला, वृद्ध, गरीब आणि गरजू अशा 400 दशलक्ष लोकांना रोख रक्कम प्रदान करण्यात आली.

**5.** टाळेबंदीच्या काळात अनेक नागरिक घरी राहिले मात्र दूध, भाजीपाला आणि फळांचा पुरवठा करणारे, आरोग्य आणि स्वच्छता कामगार, ट्रक चालक, रेल्वे आणि सार्वजनिक वाहतूक कर्मचारी, बँक कर्मचारी, वीज कामगार, आमचे अन्नदाते, पोलिस, अग्निशमन कर्मचारी आणि सशस्त्र सेना हे सगळेच नियमितपणे काम करत राहिले. आपल्याला विषाणूचा संसर्ग होऊ शकतो, या धास्तीची टांगती तलवार असतानाही ते आपली कामे करीत राहिले. या सर्वाची आम्हाला जाण आहे. मला वाटते की मी या महान सभागृहातील प्रत्येकाच्या वतीने जेव्हा बोलते, तेव्हा या सर्व स्त्री-पुरूषांप्रती मनापासून कृतज्ञता व्यक्त करते. मागच्या काही महिन्यांमध्ये देशाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी या सर्वांनी ज्याप्रकारे त्यांचे काम केले आहे, कर्तव्य पार पाडले आहे, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते.

**6.** माननीय सभापती महोदय, सार्वजिनक हितासाठी सन्माननीय संसद सदस्यांनी - खासदारांनी आणि विधानसभेच्या सभासदांनी - आमदारांनीही त्यांचे वेतन दिले.

**7.** मे 2020 मध्ये सरकारने आत्मनिर्भर भारत पॅकेज (ANB 1.0) जाहीर केले. या पॅकेजमुळे निर्माण झालेली सकारात्मक परिस्थिती टिकवून ठेवण्यासाठी, वर्षभरात, आम्ही आणखी दोन आत्मनिर्भर भारत पॅकेजेस (ANB 2.0 आणि ANB 3.0) घोषित केली. भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेल्या उपाययोजनांसह सर्व आत्मनिर्भर भारत पॅकेजेसची एकूण आर्थिक

तरतूद सुमारे 27.1 लाख कोटी रुपये होती, जी जीडीपीच्या 13% पेक्षा जास्त आहे.

**8.** सरकार म्हणून आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवले आणि परिस्थितीला अनुरूप अशी पावले उचलत राहिलो. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील सरकारने आपल्या समाजातील सर्वात असुरक्षित घटक अर्थात गरीब, दलित, आदिवासी, वृद्ध, स्थलांतरित कामगार आणि बालकांसाठी जास्तीत जास्त स्रोत उपलब्ध करून दिले. पीएमजीकेवाय, तीन आत्मनिर्भर भारत पॅकेजेस आणि त्यानंतर केलेल्या घोषणांच्या तरतुदी या पाच लघु अर्थसंकल्पांसमान होत्या.

**9.** आत्मनिर्भर पॅकेजेसमुळे देशात संरचनात्मक सुधारणांचा वेग वाढला. एमएसएमईचे पुनर्निर्धारण, खनिज क्षेत्राचे व्यावसायीकरण, कृषी आणि कामगार क्षेत्रातील सुधारणा, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण, वन नेशन- वन रेशन कार्ड, तसेच उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना, अशा उल्लेखनिय सुधारणा या काळात करण्यात आल्या. चेहराविरहित आयकर आकारणी, थेट लाभ हस्तांतरण आणि वित्तीय समावेशन अशा आणखीही सुधारणा या काळात करण्यात आल्या.

**10.** आजघडीला भारताकडे दोन लसी उपलब्ध आहेत आणि वैद्यकीयदृष्ट्या या लसींनी केवळ आपल्या देशातीलच नव्हे तर 100 पेक्षा जास्त इतर देशांमधील नागरिकांचाही कोविड -19 पासून बचाव करायला सुरवात केली आहे. आणखी दोन किंवा त्यापेक्षा जास्त लसी लवकरच उपलब्ध होतील, ही निश्चितच दिलासादायक बाब आहे.

**11.** माननीय पंतप्रधानांनी आमच्या शास्त्रज्ञांना श्रेय देऊन आणि त्यांचे आभार मानून लसीकरण मोहीमेचा शुभारंभ केला. त्यांच्या समर्थ आणि अविचल प्रयत्नांबद्दल आम्ही सदैव कृतज्ञ राहू.

**12.** या भावना व्यक्त केल्यानंतर कोवीड -19 विरोधातील आपला लढा 2021 सालातही सुरू राहणार आहे, याची पुन्हा एकदा जाणीव झाली आहे.

**13.** दोन जागतिक युद्धानंतर जे काही बदल घडले, त्याचप्रमाणे कोविडनंतरच्या जगातही राजकीय, आर्थिक आणि सामरिक संबंधांमध्ये बदल घडून येतील, अशी चिन्हे आहेत. इतिहासातील हा क्षण म्हणजे नवीन युगाची पहाट असेल – ज्या युगात भारत हा आश्वासनपूर्तीचा आणि आशावादाचा देश असेल.

***''विश्वास हा असा एक पक्षी आहे, जो ज्याला पहाट होण्यापूर्वीच सूर्योदयाची चाहूल लागते आणि तो गाऊ लागतो.''.***

*–रवींद्रनाथ टागोर*

*(Fireflies – A Collection of Aphorisms)*

**14.** याच सकारात्मक भावनेसह एक क्रिकेटप्रेमी देश म्हणून ऑस्ट्रेलियावर टीम इंडियाने नुकत्याच मिळविलेल्या विजयामुळे आम्हाला झालेला आनंद आठवतो आहे. नागरिक म्हणून, विशेषत: युवकांचा देश म्हणून उत्तम कामगिरी करून यश प्राप्त करण्याच्या आपल्या विजिगीषु वृत्तीचे स्मरण या विजयाने करून दिले आहे.

**15.** इतर देशांच्या तुलनेत भारतात आता दर दशलक्ष लोकसंख्येमागे मृत्यूचे प्रमाण सर्वात कमी म्हणजेच 112 आहे आणि दर दशलक्ष लोकसंख्येमागे रूग्णांची संख्या 130 इतकी कमी असल्याचे ताज्या आकडेवारीवरून दिसून आले आहे. या सकारात्मक आकडेवारीनेच, पुरूज्जिवित होणाऱ्या आपल्या अर्थव्यवस्थेची नव्याने पायाभरणी केली आहे.

**16.** नवीन दशकातील हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. हा अर्थसंकल्प डिजिटल आहे आणि आपणा सर्वांच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले आहे.

**17.** आतापर्यंत अर्थव्यवस्था मंदावली असताना तीन वेळा अर्थसंकल्प सादर झाले आहेत. भारतातील अर्थव्यवस्था मंदावण्याला विशिष्ट परिस्थिती कारणीभूत असते. यावेळी मात्र इतर काही देशांप्रमाणेच जागतिक साथरोगामुळेच आपल्या देशातही अर्थव्यवस्था मंदावली आहे.

**18.** या प्रास्ताविकानंतर मी आत्मविश्वासाने सांगू इच्छिते की आमचे सरकार, अर्थव्यवस्थेला पूर्वपदावर आणण्यासाठी आवश्यक ते सर्व सहाय्य आणि सुविधा देण्यास पूर्णपणे सज्ज आहे. हा अर्थसंकल्प आपल्या अर्थव्यवस्थेला शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेला वेग प्राप्त करण्याची आणि वाढविण्याची प्रत्येक संधी प्रदान करणारा आहे.

**19.** 2021 हे वर्ष, आमच्या इतिहासातील अनेक महत्त्वाचे टप्पे गाठणारे वर्ष आहे. मी यापैकी काहींचा उल्लेख करते: हे स्वातंत्र्यप्राप्तीचे 75 वे वर्ष आहे; गोव्याच्या भारतातील विलीनीकरणाचे 60 वे वर्ष आहे; 1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धाला यंदा 50 वर्षे पूर्ण होत आहेत; स्वतंत्र भारताच्या 8 व्या जनगणनेचे हे वर्ष आहे; यंदा भारताच्या ब्रिक्स अध्यक्षपदाचेही वर्ष आहे; आमच्या चांद्रयान -3 अभियानाचे हे वर्ष आहे; आणि हरिद्वार महा कुंभमेळ्याचेही वर्ष आहे.

**20.** आदरणीय सभापती महोदय, अर्थसंकल्पाचा भाग अ सुरू करण्यापूर्वी, या संकटाच्या काळात आपल्यासारख्या देशासाठी, नागरिकांचे विलगीकरण आणि त्यांना परस्परांपासून सुरक्षित अंतरावर राखणे, हे खरोखरच एक मोठे आव्हान होते, याचा उल्लेख मी आवर्जून करू इच्छिते. हे खरोखरच निर्विवादपणे एक मोठे आव्हान होते. हे करणे आमच्यासाठी खरोखर वेदनादायक होते. आपल्या सर्वांच्याच शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा कस पाहणारे, हे एक कठीण वर्ष होते. या वर्षभरात समोर येणाऱ्या संकटांचा सहनशीलपणे मुकाबला करणाऱ्या सर्व नागरिकांसमोर मी नतमस्तक आहे.

## भाग अ

**21.** भाग अ मध्ये, मी आत्मनिर्भर भारत मोहिमेचा दृष्टीकोन विषद करू इच्छिते.

**22.** आत्मनिर्भरता ही नवीन संकल्पना नाही. प्राचीन भारत हा मूळात एक स्वावलंबी देश होता, त्याचबरोबर जागतिक व्यापाराचे केंद्र होते.

**23.** आत्मनिर्भर भारत ही 130 कोटी भारतीयांची अभिव्यक्ती आहे, ज्यांचा आपल्या क्षमता आणि कौशल्यांवर पूर्ण विश्वास आहे.

**24.** आम्ही जी-20 आणि ब्रिक्स अशा आंतरराष्ट्रीय संघटनांचा भाग आहोत. भारताच्या प्रयत्नांमुळेच आज आपत्ती निवारक पायाभूत सुविधा आणि आंतरराष्ट्रीय सौर युती, प्रत्यक्षात अस्तित्वात आल्या आहेत.

**25.** भाग अ मधील प्रस्तावांमुळे देशाला प्राधान्य, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, सक्षम पायाभूत सुविधा, निरोगी भारत, सुशासन, युवकांना संधी, सर्वांसाठी शिक्षण, महिला सशक्तीकरण आणि सर्वसमावेशक विकास अशा सर्व संकल्पांना बळ प्राप्त होईल.

**26.** त्याशिवाय, 2015-16 च्या अर्थसंकल्पात आम्ही दिलेल्या 13 आश्वासनांच्या पूर्ततेला आता वेग आला आहे. आपल्या स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत असताना या अमृत महोत्सवी वर्षात या आश्वासनांची पूर्तता होणार आहे. ही आश्वासने सुद्धा आत्मनिर्भरतेची कास धरून पूर्णत्वाला जात आहेत.

**27.** 2021-22 च्या अर्थसंकल्प प्रस्तावाचे 6 प्रमुख आधारस्तंभ आहेत.

i. आरोग्य आणि स्वास्थ्य
ii. भौतिक आणि आर्थिक भांडवल आणि पायाभूत सुविधा
iii. महत्वाकांक्षी भारतासाठी सर्वसमावेशक विकास
iv. मानवी भांडवलाचे पुनरुज्जीवन
v. नवशोधन, संशोधन आणि विकास
vi. किमान सरकार आणि कमाल शासन

***1. आरोग्य आणि स्वास्थ्य***

**28.** अगदी सुरुवातीलाच मी सांगू इच्छिते की या अर्थसंकल्पात आरोग्यसंबंधी पायाभूत सुविधांवरील गुंतवणूकीत मोठ्या प्रमाणात वाढ

करण्यात आली आहे. संस्थांमध्ये सुधारणा होत जातील त्यानुसार आम्ही जास्तीत जास्त तरतूद करत राहू.

**29.** आरोग्याप्रति समावेशक दृष्टिकोन बाळगून आम्ही प्रतिबंधात्मक, उपचारात्मक आणि आरोग्य या तीन क्षेत्रांना सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करतो.

***आरोग्य यंत्रणा***

**30.** पुढच्या सहा वर्षांसाठी 64,180 कोटी रूपयांची तरतूद असणारी **पीएम आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजना** ही केंद्र सरकार पुरस्कृत नवीन योजना राबविली जाईल. या योजनेंतर्गत प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीय स्तरावरील आरोग्य यंत्रणांची क्षमता विकसित केली जाईल, आधीपासून अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय संस्था बळकट केल्या जातील आणि नवीन तसेच नव्याने प्रसार होणाऱ्या रोगांचे निदान आणि उपचार करण्यासाठी नवीन संस्था निर्माण केल्या जातील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाव्यतिरिक्त स्वतंत्रपणे ही योजना राबवली जाईल. या योजनेतील महत्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे :

a. ग्रामीण भागातील 17,788 आणि शहरी भागातील 11,024 आरोग्य आणि वेलनेस केंद्रांना सहाय्य
b. अकरा राज्यांमधील सर्व जिल्हे आणि 3382 गटांमधील सार्वजनिक आरोग्य एककांमध्ये एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांची स्थापना;
c. 602 जिल्हे आणि 12 केंद्रीय संस्थांमध्ये अतिदक्षता रुग्णालयांची स्थापना;
d. नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल (एनसीडीसी), या केंद्राच्या 5 प्रादेशिक शाखा आणि महानगरांतील 20 आरोग्य देखरेख केंद्रांचे सक्षमीकरण;

e. सर्व सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांना परस्परांशी जोडण्यासाठी सर्व राज्ये / केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकात्मिक आरोग्य माहिती पोर्टलचा विस्तार;
f. 17 नवीन सार्वजनिक आरोग्य एकके कार्यान्वित करणे तसेच 32 विमानतळ, 11 बंदरे आणि 7 लँड क्रॉसिंग क्षेत्रात असलेल्या विद्यमान सार्वजनिक आरोग्य एककांचे सक्षमीकरण;
g. आरोग्यसंबंधी 15 आपत्कालीन शस्त्रक्रिया केंद्रे आणि 2 फिरत्या रुग्णालयांची स्थापना आणि
h. जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशिया क्षेत्रासाठीच्या नॅशनल इन्स्टिट्यूशन फॉर वन हेल्थ या प्रादेशिक संशोधन मंचाची स्थापना, 9 बायो-सेफ्टी लेव्हल III प्रयोगशाळा आणि चार प्रादेशिक राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थांची स्थापना.

***पोषण***

**31.** पौष्टिक आहार, वितरण, पोहोच आणि परिणाम यांच्या सक्षमीकरणासाठी आम्ही पूरक पोषण कार्यक्रम आणि पोषण अभियान विलीन करू आणि मिशन पोषण 2.0 सुरू करू. देशातील 112 महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील पोषणसंबंधी परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी आम्ही आक्रमक धोरण स्वीकारू.

***सर्वांसाठी पाणीपुरवठा***

**32.** वैश्विक आरोग्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने स्वच्छ पाणी, स्वच्छता आणि स्वच्छ वातावरणाचे महत्त्व वारंवार सांगितले आहे.

**33.** जल जीवन अभियान (शहरी) सुरू केले जाईल. या अभियानांतर्गत 4,378 शहरी स्थानिक संस्थांमध्ये 2.86 कोटी घरगुती नळ जोडण्या प्रदान करण्यासह सर्वांसाठी पाणीपुरवठा प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे, तसेच 500 AMRUT अमृत(AMRUT) शहरांमध्ये द्रव कचरा व्यवस्थापनाचेही उद्दिष्ट आहे. ही योजना 5 वर्षे राबविली जाणार असून

त्यासाठी 2,87,000 कोटी रूपये इतका खर्च केला जाणार आहे.

***स्वच्छ भारत, स्वस्थ भारत***

**34.** भारतातील शहरी भागाच्या संपूर्ण स्वच्छतेसाठी आम्ही मलमूत्र गाळ व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थापन, कचऱ्याच्या स्त्रोतांचे विभाजन, एकदा वापरायच्या प्लास्टिकचा वापर कमी करणे, बांधकाम करताना किंवा ते उध्वस्त करताना निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रभावीपणे व्यवस्थापन करून वायू प्रदूषण कमी करणे तसेच अनेक वर्षे साठवलेल्या कचऱ्यावर जैविक प्रक्रिया करणे अशा उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करण्याचा विचार केला आहे. 2021 ते 2026 अशी 5 वर्षे शहरी स्वच्छ भारत मिशन 2.0 राबविले जाणार असून त्यासाठी एकूण 1,41,678 कोटी रूपयांची वित्तीय तरतूद करण्यात आली आहे.

***स्वच्छ हवा***

**35.** वायू प्रदूषणाच्या वाढत्या समस्येचे निराकरण करण्यासाठी, मी या अर्थसंकल्पात, दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या 42 शहरी केंद्रांसाठी 2,217 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित करते.

***स्क्रॅपिंग अर्थात भंगार विषयक धोरण***

**36.** जुनी आणि वापरासाठी अयोग्य वाहने निकाली काढण्यासाठी आम्ही स्वतंत्रपणे स्वैच्छिक वाहन स्क्रॅपिंग धोरण जाहीर करीत आहोत. यामुळे इंधन-क्षम, पर्यावरणास अनुकूल अशा वाहनांना प्रोत्साहित करण्यात मदत होईल आणि परिणामी वाहनांमुळे होणारे प्रदूषण आणि तेल आयातही कमी होईल. अशा वैयक्तिक वाहनांच्या बाबतीत 20 वर्षानंतर आणि व्यावसायिक वाहनांच्या बाबतीत 15 वर्षानंतर, स्वयंचलित फिटनेस सेंटरमध्ये या वाहनांची फिटनेस चाचणी घेतली जाईल. या योजनेचा तपशील मंत्रालयातर्फे स्वतंत्रपणे प्रदान केला जाईल.

***लसी***

**37.** न्यूमोकॉकल लस, ही भारतीय बनावटीची लस सध्या देशभरातील केवळ 5 राज्यांमध्येच दिली जाते, ती आता देशभरात दिली जाईल. या लसीकरणामुळे देशात वर्षाकाठी 50,000 पेक्षा जास्त बालमृत्यू रोखता येतील.

**38.** 2021-22 या वर्षामध्ये कोविड – 19 लसीकरणासाठी मी 35,000 कोटी रूपये प्रदान केले आहेत. आवश्यकता भासल्यास त्यासाठी आणखी तरतूद करण्यासही मी वचनबद्ध आहे.

**39.** 2021-22 या आर्थिक वर्षात आरोग्य आणि स्वास्थ्याठी 2020-21 मधील 94,452 कोटी रुपयांच्या तुलनेत 2021-22 साठी 2,23,846 कोटी रुपये खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतुद केली आहे, अर्थात 137 % वाढ केली आहे. याबाबतचे तपशील भाषणाच्या परिशिष्ट 1 मध्ये पाहता येतील.

***2. भौतिक आणि वित्तीय भांडवल आणि पायाभूत सुविधा***

***आत्मनिर्भर भारत - उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना (PLI)***

**40.** 5 ट्रिलीयन अमेरिकन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेसाठी, आपल्या उत्पादन क्षेत्रात दोन आकडी वाढीचे सातत्य टिकवावे लागेल. आमच्या उत्पादक कंपन्यांना उत्कृष्ट क्षमता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानासह जागतिक पुरवठा साखळींचा अविभाज्य भाग व्हावे लागेल. हे सर्व साध्य करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारत घडविण्याच्या उद्देशाने 13 क्षेत्रांसाठी जागतिक स्तरावरील निर्माते घडविण्याच्या उद्देशाने पीएलआय तथा उत्पादन संलग्न योजना जाहीर केल्या आहेत. यासाठी सरकारने 2021-22 या आर्थिक वर्षापासून पाच वर्षांसाठी सुमारे 1.97 लाख कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करण्याप्रति वचनबद्धता दर्शवली आहे. या उपक्रमामुळे महत्वपूर्ण क्षेत्रातील उत्पादन वाढविण्याबरोबरच, जागतिक स्तरावरील उत्कृष्ट

उत्पादक घडविण्यास तसेच आमच्या तरुणांसाठी रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल.

***वस्त्रोद्योग***

**41.** वस्त्रोद्योग हा जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होण्यासाठी, मोठ्या गुंतवणूकीला आकर्षित करण्यासाठी आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी पीएलआय अर्थात उत्पादन निगडित प्रोत्साहन योजनेव्यतिरिक्त मेगा इनव्हेस्टमेंट टेक्सटाईल पार्क्स (मित्रा) ही योजना सुरू केली जाईल. निर्यातीत जगज्जेते होण्यासाठी हे प्लग आणि प्ले सुविधांसह जागतिक पातळीवरील पायाभूत सुविधा निर्माण करेल. आगामी 3 वर्षांत 7 नवीन टेक्सटाईल पार्कची निर्मिती होईल.

***पायाभूत सुविधा***

**42.** मी डिसेंबर 2019 मध्ये जाहीर केलेली राष्ट्रीय पायाभूत सुविधा पाईपलाईन (एनआयपी) ही भारत सरकारतर्फे आजवर राबविलेल्या योजनांपैकी सर्वात पहिली योजना आहे ज्यात संपूर्ण सरकारला एकत्रित काम करावे लागेल. एनआयपी 6835 प्रकल्पांसह सुरू केली गेली होती; प्रकल्प पाइपलाइनचा विस्तार करून आता त्यात 7,400 प्रकल्प समाविष्ट करण्यात आले आहेत. काही मूलभूत पायाभूत सुविधा मंत्रालयांतर्गत सुमारे 1.10 लाख कोटी रुपयांचे 217 प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

**43.** एनआयपी हे एक विशिष्ट लक्ष्य आहे जे हे सरकार येत्या काही वर्षांत साध्य करण्यासाठी वचनबद्ध आहे. यासाठी सरकार आणि आर्थिक क्षेत्र या दोघांकडून वित्तपुरवठ्यात मोठी वाढ करावी लागेल. याच्या पूर्ततेसाठी या अर्थसंकल्पात, मी तीन मार्गांनी ठोस पावले उचलण्याचा प्रस्ताव ठेवते.

**44.** प्रथम, संस्थात्मक संरचना तयार करून; दुसरे म्हणजे, मालमत्तेचे रोखीकरण करण्यावर मोठा भर देऊन आणि तिसरे म्हणजे केंद्र आणि राज्य अर्थसंकल्पात भांडवली खर्चाचा वाटा वाढवून.

***पायाभूत सुविधांसाठी वित्तपुरवठा - विकास वित्तीय संस्था (DFI)***

**45.** पायाभूत सुविधांना दीर्घ मुदतीसाठी कर्जपुरवठा आवश्यक आहे. पायाभूत सुविधांच्या वित्तपुरवठ्यासाठी प्रदाता, समर्थक आणि उत्प्रेरक म्हणून व्यावसायिकदृष्ट्या व्यवस्थापित विकास वित्तीय संस्था आवश्यक आहे. त्यानुसार, मी डीएफआय अर्थात विकास वित्तीय संस्था स्थापित करण्यासाठी विधेयक सादर करेन. या संस्थेत भांडवलासाठी मी 20,000 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तीन वर्षांच्या कालावधीत या डीएफआयसाठी किमान `5 लाख कोटी रुपयांचे कर्ज देण्याचा पोर्टफोलिओ असण्याची महत्त्वाकांक्षा आहे.

**46.** परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांकडून आयएनव्हीआयटी आणि आरईआयटीचे कर्ज वित्तपुरवठा संबंधित कायद्यांमध्ये योग्य ते बदल करून सक्षम केले जाईल. यामुळे आयएनव्हीआयटी आणि आरईआयटींना वित्तपुरवठा करणे आणखी सुलभ होईल आणि यामुळे पायाभूत सुविधा आणि बांधकाम क्षेत्रांसाठी निधी वाढेल.

***मालमत्तेचे रोखीकरण***

**47.** नवीन पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी कार्यान्वित होणाऱ्या सार्वजनिक पायाभूत सुविधा मालमत्तांचे रोखीकरण करणे हा एक महत्वाचा अर्थपुरवठा पर्याय आहे. संभाव्य ब्राउनफिल्ड पायाभूत सुविधा मालमत्तेची “राष्ट्रीय रोखीकरण वाहिनी ” सुरू केली जाईल. प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी आणि गुंतवणूकदारांना बघण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मालमत्ता रोखीकरण डॅशबोर्ड देखील तयार केला जाईल. रोखीकरणाच्या दिशेने काही महत्त्वपूर्ण उपाय :

a. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि पीजीसीआयएल यांनी प्रत्येकी एक आयएनव्हीआयटी प्रायोजित केले आहे जे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांना आकर्षित करेल. अंदाजे 5,000 कोटी रुपये किंमतीचे पाच परिचालन रस्ते भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आयएनव्हीआयटीमध्ये हस्तांतरित केले जात आहेत. त्याचप्रमाणे 7,000 कोटी रुपयांच्या पारेषण मालमत्ता पीजीसीआयएल आयएनव्हीआयटीमध्ये हस्तांतरित केल्या जातील.
b. समर्पित मालवाहतूक मार्गिका कार्यान्वित झाल्यानंतर रेल्वे त्याच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी रोखीकरण करेल.
c. कार्यान्वयन आणि व्यवस्थापन सवलतींसाठी विमानतळाच्या पुढच्या टप्प्याचे रोखीकरण करण्यात येईल.
d. मालमत्ता रोखीकरण कार्यक्रमांतर्गत रोखीकरण होणाऱ्या इतर पायाभूत सुविधा मालमत्ता याप्रमाणे: (i) भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यान्वित टोल रस्ते (ii) पीजीसीआयएलच्या पारेषण मालमत्ता (iii) गेल, आयओसीएल आणि एचपीसीएल च्या तेल आणि गॅस पाईपलाईन (iv) द्‌वितीय आणि तृतीय श्रेणीच्या शहरांमध्ये एएआय विमानतळ (v) इतर रेल्वे पायाभूत सुविधा मालमत्ता (vii) सेंट्रल वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन आणि नाफेड सारख्या सीपीएसई च्या गोदाम मालमत्ता (viii) क्रीडा स्टेडियम.

***भांडवली अर्थसंकल्पात लक्षणीय वाढ***

**48.** 2020-21 च्या आर्थिक अंदाजपत्रकात आम्ही भांडवली खर्चासाठी 4.12 लाख कोटी रुपये प्रदान केले आहेत. आमचा प्रयत्न होता की संसाधनांची कमतरता असूनही आपण भांडवलावर जास्त खर्च करावा आणि वर्षअखेर 4.39 लाख कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे ज्याची तरतूद मी 2020-21 च्या सुधारित अंदाजपत्रकात केली आहे. 2021-22

साठी मी भांडवली खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढीचा प्रस्ताव ठेवला आहे आणि त्याद्वारे 5.54 लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे जी 2020-21 च्या आर्थिक अंदाजापेक्षा 34.5% जास्त आहे. यापैकी मी भांडवली खर्चावर चांगली प्रगती दर्शविणाऱ्या आणि पुढील निधीची गरज असलेल्या प्रकल्प / कार्यक्रम / विभागांसाठी पुरविल्या जाणाऱ्या आर्थिक व्यवहार विभागाच्या अर्थसंकल्प शीर्षात `44,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम ठेवली आहे. या खर्चाशिवाय , आम्ही राज्ये आणि स्वायत्त संस्थांना त्यांच्या भांडवली खर्चासाठी 2 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम देखील प्रदान करू.

**49.** पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर आपल्या अर्थसंकल्पातील जास्त खर्च करायला राज्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही विशिष्ट यंत्रणांवर कार्य करू.

***रस्ते आणि महामार्ग पायाभूत सुविधा***

**50.** 5.35 लाख कोटी रुपये किमतीच्या भारतमाला प्रकल्पांतर्गत 3.3 लाख कोटी रुपये किमतीच्या 13,000 किमी पेक्षा अधिक लांबीच्या रस्ते बांधकामासाठी मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी 3,800 कि.मी. रस्त्यांचे बांधकाम याआधीच पूर्ण झाले आहे. मार्च 2022 पर्यंत आणखी 8,500 कि.मी.चे रस्ते बांधणार असून अतिरिक्त 11,000 कि.मी. राष्ट्रीय महामार्ग मार्गिका पूर्ण करणार आहोत.

**51.** रस्ते पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी अधिक आर्थिक कॉरिडॉरचेही नियोजन केले जात आहे. त्यापैकी काही याप्रमाणे:

a. तामिळनाडू राज्यात 1.03 लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीतून 3,500 किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाचे काम. यात मदुराई-कोल्लम कॉरिडोर, चित्तूर-थंचूर कॉरिडॉरचा समावेश आहे. पुढील वर्षी बांधकाम सुरू होईल.

b. केरळमधील कन्याकुमारी- मुंबई कॉरिडोरच्या 600 कि.मी. विभागासह 65,000 कोटी रुपये गुंतवणुकीच्या 1,100 किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाचे काम.

c. पश्चिम बंगाल राज्यात कोलकाता- सिलीगुडी या सध्याच्या रस्त्याच्या सुधारणेसह 25,000 कोटी रुपये खर्चाच्या 675 कि.मी. महामार्गाचे काम सुरू आहे.

d. आसाम राज्यात सध्या 19,000 कोटी रुपये खर्चाची राष्ट्रीय महामार्गाची कामे सुरू आहेत. पुढील तीन वर्षांत राज्यात 34,000 कोटी रुपये खर्चाच्या 1300 किलोमीटरहून अधिक लांबीच्या राष्ट्रीय महामार्गांचे काम हाती घेतले जाईल.

**52.** 2021-22 मधील काही उल्लेखनीय उपक्रम म्हणून काही महत्वाकांक्षी कॉरिडोर आणि इतर महत्त्वपूर्ण प्रकल्प जोडपत्र -II मध्ये आहेत.

**53.** रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयासाठी मी 1,18,101 लाख कोटी रुपयांच्या वाढीव खर्चाची तरतूद केली आहे, त्यापैकी 1,08,230 कोटी रुपये भांडवली खर्चासाठी आहेत ,जी आत्तापर्यंतची सर्वाधिक तरतूद आहे.

***रेल्वे पायाभूत सुविधा***

**54.** भारतीय रेल्वेने 2030 पर्यंत भारतासाठी एक राष्ट्रीय रेल्वे योजना तयार केली आहे. 2030 पर्यंत 'भविष्यकालीन सुसज्ज' रेल्वे प्रणाली तयार करण्याची ही योजना आहे.

**55.** आमच्या उद्योगासाठी वाहतूक खर्च कमी करणे हे 'मेक इन इंडिया' सक्षम करण्याच्या आमच्या धोरणाचा गाभा आहे. वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर (डीएफसी) समर्पित माल वाहतूक मार्गिका पश्चिम आणि ईस्टर्न डीएफसी समर्पित माल वाहतूक मार्गिका पूर्व हे दोन्ही मार्ग जून

2022 पर्यंत चालू होतील अशी अपेक्षा आहे . याशिवाय पुढील अतिरिक्त उपक्रम प्रस्तावित आहेतः

a. ईस्टर्न डीएफसीचा सोननगर-गोमोह विभाग (263.7 किमी) 2021-22 मध्ये पीपीपी मोडमध्ये घेतला जाईल. 274.3 किमी लांबीचा गोमोह-डंकुनी विभाग लवकरच पीपीपी मोडमध्ये घेण्यात येईल.
b. खरगपूर ते विजयवाडा ईस्ट कोस्ट कॉरिडोर, भुसावळ ते खरगपूर ते डंकुनी हा ईस्ट-वेस्ट कॉरिडोर आणि इटारसी ते विजयवाडा पर्यंत उत्तर-दक्षिण कॉरिडोर हे समर्पित मालवाहतूक मार्गिका प्रकल्प आम्ही भविष्यात राबविणार आहोत. पहिल्या टप्प्यात सविस्तर प्रकल्प अहवाल हाती घेण्यात येतील.
c. 1ऑक्टोबर 2020 रोजी 41,548 आरकेएम वरून 2021 च्या अखेरीस 46,000 आरकेएम म्हणजेच 72% पर्यंत ब्रॉडगेज रूट किलोमीटर (आरकेएम) चे विद्युतीकरण झालेले असेल. ब्रॉडगेज मार्गांचे 100% विद्युतीकरण डिसेंबर, 2023 पर्यंत पूर्ण होईल.

**56.** प्रवाशांच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी पुढील उपाय प्रस्तावित आहेतः

a. प्रवाशांना उत्तम प्रवासाचा अनुभव देण्यासाठी आम्ही प्रमुख पर्यटन मार्गांवर सौंदर्यदृष्ट्या रचना केलेल्या व्हिस्टा डोम एलएचबी कोचची निर्मिती करू.
b. मागील काही वर्षांत हाती घेतलेल्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांचे परिणाम आता दिसू लागले आहेत. हा प्रयत्न अधिक बळकट करण्यासाठी उच्च घनतेचे नेटवर्क आणि
c. भारतीय रेल्वेच्या अत्यधिक वापरातील मार्गांना मानवी चुकांमुळे रेल्वेगाड्यांची टक्कर टाळण्यासाठी स्वदेशी विकसित स्वयंचलित ट्रेन संरक्षण प्रणाली पुरविली जाईल.

d. मी रेल्वेसाठी सर्वाधिक 1,10,055 कोटी रुपयांची तरतूद केली आहे ज्यात 1,07,100 कोटी रुपये भांडवली खर्चाची तरतूद आहे.

***शहरी पायाभूत सुविधा***

**57.** मेट्रो रेल नेटवर्कचा विस्तार आणि शहरी बस सेवा वाढवून आम्ही शहरात सार्वजनिक वाहतुकीचा वाटा वाढवण्याच्या दिशेने कार्य करू. सार्वजनिक बस परिवहन सेवा वाढविण्यासाठी 18,000 कोटी रुपये खर्च करून नवीन योजना सुरू केली जाईल. खासगी क्षेत्रातील उद्योजकांकडून 20,000 बसगाड्यांसाठी वित्तपुरवठा, अधिग्रहण, परिचालन आणि देखरेख करण्यासाठी या योजनेत नवीन पीपीपी मॉडेल्स लागू करण्याची सोय असेल. ही योजना वाहन उद्योगाला चालना देईल, आर्थिक विकासात भरभराट करेल, आपल्या तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करेल आणि शहरी रहिवाशांसाठी वाहतूक सुलभता वाढवेल.

**58.** सध्या देशात एकूण 702 कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यरत असून 27 शहरांमध्ये 1,016 किमी लांबीचा मेट्रोमार्ग व आरआरटीएसचे काम सुरू आहे. द्वितीय श्रेणी आणि प्रथम श्रेणी शहरांच्या परिघीय भागात समान अनुभव, सोयी आणि सुरक्षा यासह कमी किंमतीत मेट्रो रेल प्रणाली उपलब्ध करण्यासाठी दोन नवीन तंत्रज्ञानाचा उदा. ‘मेट्रोलाईट’ आणि ‘मेट्रोनिओ’ यांचा वापर करण्यात येणार आहे.

**59.** सेंट्रल काउंटरपार्ट फंड (केंद्रीय प्रतिभाग निधी) यांना प्रदान केला जाईल:

a. 1957.05 कोटी रुपये खर्चाचा 11.5 किमीचा कोची मेट्रो रेल्वे टप्पा -2
b. 63,246 कोटी रु खर्चाचा 118.9 किमीचा चेन्नई मेट्रो रेल्वे टप्पा - 2
c. 14,788 कोटी रु खर्चाचा 58.19 कि.मी.चा बेंगळुरू मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा 2 ए आणि 2 बी

d. अनुक्रमे, 5,976 कोटी आणि `2,092 कोटी रुपये किमतीचे नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा- 2 आणि नाशिक मेट्रो प्रकल्प.

***ऊर्जा पायाभूत सुविधा***

**60.** मागील 6 वर्षात वीज क्षेत्रात बऱ्याच सुधारणा झाल्या व यश मिळाले. 139 गीगा वॅट्सची स्थापित क्षमता आणि 1.41 लाख सर्किट किलोमीटर लांबीच्या पारेषण वाहिन्या जोडल्या गेल्या आणि अतिरिक्त 2.8 कोटी कुटुंबांना वीज जोडणी देण्यात आली.

**61.** देशभरातील वीज वितरण कंपन्यात एकतर सरकारी किंवा खाजगी मक्तेदारी आहे या पार्श्वभूमीवर स्पर्धात्मकतेला प्रोत्साहन देऊन ग्राहकांना निवडीचा पर्याय देण्याची आवश्यकता आहे. ग्राहकांना एकापेक्षा जास्त वितरण कंपन्यांमधून पर्याय निवडण्यासाठी एक चौकट तयार केली जाईल.

**62.** वीज वितरण कंपन्यांची व्यवहार्यता ही एक गंभीर चिंता आहे. निर्मितीवर भर देण्यात आलेल्या सुधारणा आधारित निकाल-निगडित 3,05,984 कोटी खर्चाची वीज-वितरण क्षेत्र योजना येत्या पाच वर्षात सुरू केली जाईल. प्री-पेड स्मार्ट मीटरिंग आणि फीडर वेगळे करणे, प्रणाली अद्ययावत करणे यासह पायाभूत सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सुधारणांशी जोडलेली ही योजना डिसकॉम्सना सहाय्य करेल.

**63.** 2020 मध्ये तिसऱ्या पुनर्गुंतवणूक परिषदेत बोलताना पंतप्रधानांनी सर्वसमावेशक राष्ट्रीय हायड्रोजन ऊर्जा अभियान सुरू करण्याची योजना जाहीर केली. आता हरित ऊर्जा स्त्रोतांमधून हायड्रोजन निर्माण करण्यासाठी 2021-22 मध्ये हायड्रोजन ऊर्जा अभियान सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.

***बंदरे, नौवहन, जलमार्ग***

**64.** देशातील महत्वाची बंदरे त्यांच्या परिचालन सेवांचे स्वत: व्यवस्थापन करण्याऐवजी खाजगी भागीदारीतून व्यवस्थापन करण्याचे

मॉडेल स्वीकारतील. यासाठी , आर्थिक वर्ष 21-22 मध्ये देशातील प्रमुख बंदरांकडून 2,000 कोटी रुपयांहून अधिक किमतीचे ७ मोठे प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारी तत्वावर देण्यात येतील.

**65.** भारतीय नौवहन कंपन्यांना, मंत्रालये आणि सीपीएसईच्या जागतिक निविदांमध्ये 5 वर्षांच्या कालावधीत 1624 कोटी रुपयांचे अनुदान सहाय्य देऊन भारतीय व्यापारी जहाजांच्या निर्मितीस प्रोत्साहन देणारी योजना सुरू केली जाईल. या उपक्रमामुळे भारतीय नौवहन कर्मचाऱ्यांसाठी अधिक प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळतील तसेच जागतिक कंपन्यांमध्ये भारतीय कंपन्यांचा वाटा वाढेल.

**66.** भारताने जहाजे पुनर्वापर अधिनियम, 2019 ची अंमलबजावणी करून हाँगकाँग आंतरराष्ट्रीय अधिवेशनाला मान्यता दिली. गुजरातमधील अलंग येथील सुमारे 90 जहाज पुनर्चक्रीकरण यार्डांनी यापूर्वी एचकेसी-अनुपालन प्रमाणपत्रे मिळविली आहेत. युरोप आणि जपानमधून अधिक जहाजे भारतात पुनर्वापरासाठी आणण्याचा प्रयत्न केला जाईल. 2024 पर्यंत भारताची पुनर्वापर क्षमता दुप्पट म्हणजेच सुमारे 4.5 दशलक्ष लाइट डिस्प्लेसमेंट टोने (एलडीटी) इतकी होईल. यामुळे आपल्या तरूणांसाठी अतिरिक्त 1.5 लाख रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे.

***पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू***

**67.** कोविड -19 टाळेबंदीच्या कालावधीत कोणत्याही व्यत्ययाशिवाय आमच्या सरकारने देशभर इंधन पुरवठा चालू ठेवला आहे. लोकांच्या जीवनात या क्षेत्राच्या महत्त्वपूर्ण स्वरूपाची दखल घेऊन खालील मुख्य पुढाकार जाहीर केले जात आहेत:

a. उज्ज्वला योजना ज्याचा फायदा 8 कोटी घरांना झाला त्या योजनेचा विस्तार आणखी 1 कोटी लाभार्थ्यांपर्यंत करण्यात येणार आहे.

b. पुढील 3 वर्षांत शहर गॅस वितरण नेटवर्कमध्ये आणखी 100 जिल्हे जोडणार

c. जम्मू-काश्मीरमध्ये नवीन गॅस पाइपलाइन प्रकल्प सुरु होणार.

d. कोणत्याही भेदभावाशिवाय सुगम्य प्रवेश आधारावर सर्व नैसर्गिक गॅस पाइपलाइनमध्ये सामान्य वाहक क्षमतेच्या बुकिंगच्या सुलभतेसाठी आणि समन्वयासाठी स्वतंत्र गॅस ट्रांसपोर्ट सिस्टम ऑपरेटर स्थापित केले जाईल.

***आर्थिक भांडवल***

**68.** मी, सेबी अधिनियम, 1992, डिपॉझिटरीज अधिनियम, 1996,, सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (रेग्युलेशन) अधिनियम 1956 आणि गव्हर्नमेंट सिक्युरिटीज अधिनियम 2007 मधील तरतुदी एकत्रित करून एक तर्कसंगत एकल भांडवली बाजार संहिता विकसित करण्याचा प्रस्ताव ठेवते.

**69.** जीआयएफटी-आयएफएससी अर्थात गुजरात आन्तरराष्ट्रीय वित्तीय आणि तंत्रज्ञान शहरात येथे जागतिक दर्जाच्या फिन-टेक हबच्या विकासाला सहाय्य्य करण्यास सरकार पाठिंबा देईल.

**70.** ताणतणावाच्या वेळी कॉर्पोरेट बॉंड मार्केटमधील सहभागींमध्ये आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि सर्वसाधारणपणे दुय्यम बाजारातील तरलता वाढविण्यासाठी कायमस्वरुपी संस्थात्मक चौकट तयार करण्याचा प्रस्ताव आहे. प्रस्तावित संस्था तणावपूर्ण आणि सामान्य काळात गुंतवणूक दर्जाचे कर्ज रोखे खरेदी करुन रोखे बाजाराच्या विकासाला मदत करेल.

**71.** 2018-19 च्या अर्थसंकल्पात सरकारने देशात नियंत्रित सोने बाजाराची व्यवस्था स्थापित करण्याचा आपला हेतू जाहीर केला होता. यासाठी सेबीला नियामक आणि गोदामविकास आणि नियामक प्राधिकरण म्हणून अधिसूचित केले जाईल . त्या अंतर्गत वोल्टिंग, अस्केईंग, लॉजिस्टिक यांच्यासह गोदाम व्यवस्थापन यांची वायदे बाजाराच्या धर्तीवर सोन्यासाठी प्रणाली तयार करण्यासाठी सेबीला बळकट केले जाईल.

**72.** सर्व वित्तीय गुंतवणूकदारांचा हक्क म्हणून गुंतवणूकदारांची सनद विकसित करण्याचा प्रस्ताव मी ठेवते.

**73.** अपारंपरिक ऊर्जा क्षेत्राला आणखी चालना देण्यासाठी भारतीय सौर ऊर्जा महामंडळाला `1,000 कोटी रुपये आणि भारतीय नूतनीकरणयोग्य ऊर्जा विकास संस्थेला` 1,500 कोटी रुपये अतिरिक्त भांडवल पुरवण्याचा प्रस्ताव मी ठेवते.

***विमा क्षेत्रात थेट परदेशी गुंतवणुकीत वाढ***

**74.** विमा कंपन्यांमध्ये थेट परदेशी गुंतवणुक मर्यादा 49% वरून 74% पर्यंत वाढविण्यासाठी आणि परदेशी मालकी आणि सुरक्षित उपायांसह नियंत्रणास परवानगी देण्यासाठी मी विमा कायदा 1938 मध्ये दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. नवीन संरचनेनुसार बोर्डावरील बहुसंख्य संचालक आणि मुख्य व्यवस्थापन करणारे भारतीय रहिवासी असतील, ज्यात किमान 50% संचालक स्वतंत्र संचालक असतील आणि विशिष्ट टक्केवारीचा नफा सामान्य राखीव गंगाजळी म्हणून कायम ठेवला जाईल.

***नवीन संरचनेद्वारे अनुत्पादक मालमत्ता निराकरण***

**75.** सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी त्यांचा ताळेबंद सुधारण्यासाठी त्यांच्या अनुत्पादक मालमत्तेसाठी उच्च स्तरीय तरतूद करणे आवश्यक आहे. अस्तित्वात असलेल्या अनुत्पादक कर्जाचे एकत्रीकरण करून नंतर मालमत्ता व्यवस्थापन करून त्या विकून पर्यायी गुंतवणूक निधी आणि इतर संभाव्य गुंतवणूकदारांना अंतिम मूल्य प्राप्तीसाठी मालमत्ता पुनर्रचना कंपनी लिमिटेड आणि मालमत्ता व्यवस्थापन कंपनीची स्थापना केली जाईल.

***पीएसबी अर्थात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे पुनर्भांडवलीकरण***

**76.** पीएसबीची आर्थिक क्षमता आणखी मजबूत करण्यासाठी 2021-22 मध्ये `20,000 कोटी रुपयांचे पुनर्भांडवलीकरण प्रस्तावित आहे.

***ठेव विमा***

**77.** मागील वर्षी सरकारने ठेवीवरील विमा संरक्षणात वाढ करायला मान्यता दिली होती. बँक ग्राहकांसाठी ठेवीवरील विमा संरक्षण 1 लाख रुपयांवरून 5 लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आले. मी या सत्रात डीआयसीजीसी अधिनियम, 1961 मध्ये तरतुदी सुलभ करण्यासाठी, दुरुस्ती करीत आहे. जेणेकरुन एखादी बँक आपली जबाबदारी पार पाडण्यास तात्पुरती असमर्थ असेल तर अशा बँकेच्या ठेवीदारांना ठेव विमा संरक्षण मर्यादेपर्यंत त्यांच्या ठेवी वापरण्याची सहज आणि कालबद्ध संधी मिळू शकेल. यामुळे सध्या तणावाखाली असणाऱ्या बँकांच्या ठेवीदारांना मदत होईल.

**78.** छोट्या कर्जदारांच्या हिताचे रक्षण करत असताना पत शिस्त सुधारण्याकरिता, 100 कोटी रुपये किमान मालमत्ता मूल्य असलेल्या एनबीएफसी अर्थात बिगर बँकिंग वित्तीय संस्थांसाठी, प्रतिभूतीकरण आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा 2002 अंतर्गत पात्र किमान कर्जाची मर्यादा, 50 लाख रुपयांवरून 20 लाख रुपयांपर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव आहे.

***कंपनी प्रकरणे***

**79.** कंपनी अधिनियम 2013 अन्वये प्रक्रियात्मक आणि आपसात मिटवता येण्याजोगते तांत्रिक गुन्हे दोषमुक्त करण्याची प्रक्रिया आता पूर्ण झाली आहे. मी आता मर्यादित दायित्व भागीदारी (एलएलपी) अधिनियम, 2008 दोषमुक्त करण्याचे प्रस्तावित करते.

**80.** महोदय, मी कंपनी कायदा 2013 अंतर्गत छोट्या कंपन्यांच्या व्याख्येत सुधारणा करण्याचा प्रस्ताव ठेवते, ज्या अंतर्गत त्यांची देय भांडवलाची किमान मर्यादा “50 लाखांपेक्षा जास्त नाही वरून 2 कोटीपेक्षा

जास्त नाही" आणि व्यवसाय उलाढाल "2 कोटीपेक्षा जास्त नाही वरून 20 कोटींपेक्षा जास्त नाही" अशी केली जाईल.या निर्णयाचा दोन लाखाहून अधिक कंपन्यांना फायदा होणार असून त्यांना आवश्यकता पूर्तता करणे सुलभ होईल.

**81.** स्टार्ट-अप्स आणि इनोव्हेटर्सना थेट फायदा होणारा पुढील उपाय म्हणून, एकल-व्यक्ती कंपनीच्या समावेशास प्रोत्साहित करून देय भांडवल आणि उलाढालीवर कोणतेही बंधन न ठेवता त्यांच्या प्रगतीस अनुमती आणि त्यांचे इतर कोणत्याही प्रकारच्या कंपनीमध्ये रूपांतरण करण्यास परवानगी देऊन भारतीय नागरिकासाठी ओपीसी- एकल-व्यक्ती कंपनी स्थापित करण्यासाठी निवासी मर्यादा 182 दिवसांवरून 120 दिवसांपर्यंत कमी करणे आणि अनिवासी भारतीयांना भारतात ओपीसी एकल-व्यक्ती कंपनी सुरू करण्याची परवानगी देण्याचा मी प्रस्ताव ठेवते.

**82.** कर्ज विषयक प्रकरणांचे वेगवान निराकरण करण्यासाठी एनसीएलटीची चौकट मजबूत केली जाईल, ई-कोर्ट प्रणाली कार्यान्वित केली जाईल आणि कर्ज निराकरण करण्याच्या वैकल्पिक पद्धती आणि एमएसएमईसाठी विशेष चौकट सुरू केली जाईल.

**83.** येत्या आर्थिक वर्ष 2021-22 दरम्यान आम्ही डेटा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग चालित MCA21 आवृत्ती 3.0 सुरू करणार आहोत. या आवृत्ती 3.0 मध्ये ई-छाननी, ई-अभिनिर्णय, ई-सल्लामसलत आणि अनुपालन व्यवस्थापनासाठी अतिरिक्त मॉड्यूल असतील.

***निर्गुंतवणूक आणि धोरणात्मक विक्री***

**84.** कोविड -19 असूनही आम्ही धोरणात्मक निर्गुंतवणुकीच्या दिशेने कार्य करत आहोत. बीपीसीएल, एअर इंडिया, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, आयडीबीआय बँक,

बीईएमएल, पवन हंस, नीलाचल इस्पात निगम लिमिटेड असे अनेक व्यवहार 2021-22 मध्ये पूर्ण होतील. आयडीबीआय बँक व्यतिरिक्त आम्ही सन 2021-22 मध्ये दोन सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि एका सर्वसाधारण विमा कंपनीचे खासगीकरण करण्याचा प्रस्ताव ठेवतो. यासाठी कायदेशीर दुरुस्त्या आवश्यक आहेत आणि मी या अधिवेशनातच त्या दुरुस्ती सादर करण्याचा प्रस्ताव ठेवते.

**85.** 2021-22 मध्ये आम्ही एलआयसीचा आयपीओ अर्थात प्रारंभिक खुली समभाग विक्री योजना आणत आहोत ज्यासाठी मी या सत्रातच आवश्यक त्या दुरुस्त्या आणत आहे.

**86.** आत्मनिर्भर पॅकेजमध्ये मी जाहीर केले होते की आम्ही सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या धोरणात्मक निर्गुंतवणुकीचे धोरण पुढे आणू. शासनाने या धोरणाला मान्यता दिली आहे याची माहिती सभागृहाला देण्यास मला आनंद होत आहे. हे धोरण सर्व बिगर धोरणात्मक आणि धोरणात्मक क्षेत्रातील निर्गुंतवणुकीसाठी स्पष्ट आराखडा प्रदान करते. आम्ही अशी चार क्षेत्रे ठेवली आहेत जी धोरणात्मक आहेत जिथे किमान सीपीएसई कायम ठेवल्या जातील आणि उर्वरित खासगीकरण केले जाईल. उर्वरित क्षेत्रात सर्व सीपीएसईचे खाजगीकरण केले जाईल. धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये जोडपत्र-III मध्ये नमूद केली आहेत.

**87.** निर्गुंतवणुकीचे धोरण पुढे चालवताना मी आता निती आयोगाला केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील अशा काही कंपन्यांची यादी बनवण्यास सांगत आहे, ज्यांच्या नावांचा विचार येत्या काळात धोरणात्मक निर्गुंतवणुकीसाठी केला जाऊ शकतो.

**88.** सर्व राज्यांनी त्यांच्या अखत्यारितील सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांची निर्गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून केंद्रीय निधी पुरवठ्याची योजना आम्ही तयार करत आहोत.

89. निष्क्रिय मालमत्तांमधून आत्मनिर्भर भारतासाठी योगदान मिळू शकत नाही. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या तसेच सरकारी मंत्रालय व खात्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनींचा समावेश अशा कमी महत्त्वाच्या मालमत्तेत होतो. या मालमत्तां मधून मिळकत हवी असल्यास त्या विकणे अथवा सवलत किंवा मक्तेदारी सारख्या इतर माध्यमांमधून मिळकत मिळू शकते. या कामासाठी विशिष्ट क्षमतेची गरज आहे. म्हणून मी एका स्वतंत्र कंपनीच्या स्थापनेचा प्रस्ताव ठेवत आहे. ही कंपनी केवळ याच कामासाठी चालवली जाईल.

90. सतत तोट्यात चालणाऱ्या अथवा आजारी असलेल्या केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या वेळच्यावेळी बंद करण्यासाठी एक सुधारित प्रणाली आम्ही लवकरच सादर करणार आहोत.

91. 2021 -22 च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार निर्गुंतवणूकीतून 1,75,000 कोटी रुपये मिळतील अशी अपेक्षा आहे.

***सरकारी आर्थिक सुधारणा***

92. 'अंडर द ट्रेझरी सिंगल अकाउंट' च्या पद्धतीनुसार सरकारच्या खात्यामधून स्वायत्त संस्था प्रत्यक्ष खर्चाच्या वेळेसच निधी काढून घेऊ शकत होत्या. त्यामुळे व्याजाची बचत होत होती. आता 2021 -22 पासून आम्ही ही पद्धत सर्व प्रकारच्या संस्थांसाठी खुली करत आहोत.

93. 15 व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्राने प्रायोजित केलेल्या सर्व योजनांची संख्या कमी करून त्यांचा आपापसात ताळमेळ वाढवण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न करत आहोत. यामुळे खर्च होणाऱ्या निधीचा प्रभावी उपयोग होऊ शकेल.

94. बहुराज्यीय सहकारी संस्थांच्या विकासासाठी सरकार वचनबद्ध आहे व सर्व प्रकारची मदत देऊ करेल. सहकारी संस्थांची व्यवसाय

सुलभता वाढवण्यासाठी मी प्रस्ताव ठेवते की, त्यांच्यासाठी एक स्वतंत्र प्रशासकीय प्रणाली विकसित करावी.

### *3. महत्त्वाकांक्षी भारतासाठी सर्वसमावेशक विकास*

**95.** माननीय अध्यक्ष महोदय, या स्तंभाखाली मी कृषी व संबंधित क्षेत्रे, शेतकरी कल्याण व ग्रामीण भारत ,स्थलांतरित कामगार व श्रमजीवी आणि आर्थिक समावेशन या मुद्याचे विवेचन करणार आहे.

### *कृषिक्षेत्र*

**96.** आमचे सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रती वचनबद्ध आहे. आमच्या कालावधीत 'किमान आधारभूत किंमत' योजनेत मोठा बदल होत असून सर्व प्रकारच्या शेतमालाच्या उत्पादन खर्चाच्या दीडपट रक्कम आता किमान आधारभूत किंमत म्हणून दिली जात आहे. मालाची खरेदीही स्थिर वेगाने वाढत आहे. यामुळे शेतकऱ्यांची मिळकत मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

**97.** गव्हाच्या पिकाच्या खरेदीवर 2013- 14 सालामध्ये सरकारने 33,874 कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले होते. 2019-20 साला मध्ये ते वाढून 62,802 कोटी रुपये झाले होते. 2020-21 सालात ते आणखी वाढून 75, 606 कोटी रुपये झाले आहेत. गव्हाचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 2019- 20 मध्ये 35.57 लाख होती ती 2020- 21 मध्ये वाढून 43.36 लाख झाली आहे.

**98.** भात पिकांसाठी 2013- 14 सालात सरकारने 63,928 कोटी रुपयाची खरेदी केली होती . 2019- 20 मध्ये ते प्रमाण वाढून 1,41,930 कोटी रुपये तर 2020- 21 मध्ये ही खरेदी वाढून 1,72,752 कोटीं रुपये पर्यंत पोचण्याचा अंदाज आहे. याचा फायदा घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 2019- 20 सालात 1.24

कोटी होती ती 2020 -21 सालात 1.54 कोटींपर्यंत वाढली आहे.

**99.** याचप्रमाणे डाळींच्या खरेदीवर 2013- 14 मध्ये सरकारने रुपये 236 कोटी खर्च केले होते. 2019 -20 मध्ये ते वाढून रुपये 8285 कोटी झाले तर आता2020-21 मध्ये ही खरेदी रक्कम वाढवून रुपये 10,530 कोटी झाली आहे. 2013- 14 च्या तुलनेत ही वाढ रू 40 कोटींपेक्षा जास्त आहे.

**100.** कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना 2013- 14 साली सरकारकडून रुपये 90 कोटी मिळाले होते आणि 27 जानेवारी 2019 च्या दिवशीपर्यंत सरकारने खरेदी केलेल्या कापसाची किंमत रुपये 25,974 कोटी होती. याबद्दल सविस्तर माहिती परिशिष्ट चार मध्ये आहे.

**101.** या वर्षाच्या सुरुवातीला प्रधानमंत्री यांनी 'स्वामित्व' योजनेची सुरुवात केली होती. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मालमत्तेच्या मालकांना त्यांचे हक्क लिखित स्वरूपात दिले जातात. आतापर्यंत 1,241 गावांमधील 1.80 लाख मालकांना त्यांच्या मालकी हक्काचे कार्ड दिले गेले आहे. आर्थिक वर्ष 2021- 22 दरम्यान ही योजना सर्व राज्यात तसेच केंद्रशासित प्रदेशात राबवली जावी असे मी प्रस्तावित करत आहे.

**102.** शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार पतपुरवठा करण्यासाठी मी आर्थिक वर्ष 2022 पर्यंतचे कृषी पतपुरवठा लक्ष्य वाढवून रुपये 16.5 लाख कोटी करत आहे. पशुपालन,दुग्धव्यवसाय तसेच मासेमारीच्या व्यवसायांसाठी पतपुरवठा वाढवण्यावर आम्ही भर देणार आहोत.

**103.** ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीसाठी तरतूद रुपये 30,000 कोटींवरून वाढवून रुपये 40,000 कोटी करणार आहोत.

**104.** नाबार्ड च्या अंतर्गत सूक्ष्म सिंचन निधी चा रुपये 5000 कोटी असलेल्या संचित निधी मध्ये रुपये 5000 कोटींची भर घालून तो दुप्पट म्हणजे रुपये 10000 कोटी करावा असा प्रस्ताव मी मांडत आहे.

**105.** कृषी तसेच कृषी पूरक क्षेत्रांचे मूल्य संवर्धन व्हावे तसेच निर्यात वाढावी यासाठी ऑपरेशन 'ग्रीन स्कीम' सुरू आहे. त्याचा फायदा सध्या टोमॅटो, कांदा व बटाट्याच्या पिकांना मिळतो आहे. या योजनेची व्याप्ती वाढवून त्यात आणखी 22 नाशवंत शेतमालाची भर घातली जाईल.

**106.** इ-नाम बाजारपेठेत सुमारे 1.68 लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून या बाजाराद्वारे रुपये 1.14 लाख कोटींचे व्यवहार झाले आहेत. इ-नाम बाजारपेठांमुळे शेतमाल व्यवहारात पारदर्शकता तसेच स्पर्धात्मकता आली असून आता आणखी एक हजार बाजार समित्यांना इ- नाम शी जोडण्यात येणार आहे.

**107.** कृषी उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी कृषी पायाभूत सुविधा निधीमधून निधी पुरवठा केला जाईल.

***मत्स्यव्यवसाय***

**108.** आधुनिक मासेमारी बंदरे तसेच मासे उतरविण्याची केंद्रे विकसित करण्यासाठी मी मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीचा प्रस्ताव ठेवत आहे. सुरुवातीला कोची, चेन्नई, विशाखापट्टणम, पारादीप व पेटुवाघाट ही पाच मासेमारीची बंदरे ही आर्थिक व्यवहारांची केंद्रे म्हणून विकसित केली जातील. देशांतर्गत नदीमार्ग तसेच इतर जलमार्गांच्या काठांवर मासेमारीची बंदरे तसेच मासे उतरविण्याची केंद्रे विकसित केली जातील.

**109.** समुद्र वेलींची शेती हे एक नवीन उदयाला येणारे क्षेत्र असून त्यात किनारी भागात राहणाऱ्या निवासींचे जीवनमान उंचावण्याची क्षमता आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन अतिरिक्त मिळकत प्राप्त होईल. समुद्र वेलींच्या शेतीचा विकास होण्यासाठी मी तामिळनाडू मध्ये बहुउपयोगी समुद्र वेल उद्यानाचा प्रस्ताव सादर करत आहे.

***स्थलांतरित कामगार आणि श्रमजीवी***

**110.** आम्ही सुरू केलेल्या 'एक देश –एक शिधापत्रिका ' या योजनेद्वारा लाभार्थी त्यांचे स्वस्त धान्य देशातल्या कोणत्याही भागातून मिळवू शकतील. कामानिमित्त स्थलांतरित झालेल्या कामगारांना याचा विशेष लाभ मिळेल. कुटुंबापासून दूर राहणारे लोक त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी त्यांच्या रेशनचा काही भाग मिळवू शकतील. त्यांच्या मूळ गावी राहणाऱ्या कुटुंबाला उरलेले धान्य त्यांच्याच गावात मिळू शकेल. मला आपणास सांगायला आनंद होतो आहे, की 32 राज्ये व केंद्रशासित प्रदेशात राहणाऱ्या 69 कोटी लाभार्थीपर्यंत ही 'एक देश - एक शिधापत्रिका' योजना पोहोचली असून यांची संख्या एकूण लाभार्थींच्या 86 टक्के आहे. येत्या काही महिन्यात उरलेली चार राज्ये व केंद्रशासित प्रदेश ही या योजनेत समाविष्ट होतील.

**111.** असंघटित कामगारांसाठी व विशेषतः स्थलांतरित कामगारांसाठी मी एका नवीन पोर्टलचा प्रस्ताव ठेवत आहे. या पोर्टल मध्ये अशा कामगारांची सर्व संबंधित माहिती साठवून ठेवता येईल. त्यात बांधकाम मजूर तसंच हंगामी कामगार यांचाही समावेश असेल. यामुळे आरोग्य, निवास व्यवस्था ,कौशल्य, विमा ,पतपुरवठा तसेच अन्नपुरवठा बद्दलच्या योजना तयार करताना मदत मिळेल.

**112.** चार कामगार नियमनांच्या द्वारे 20 वर्षांपूर्वी सुरू झालेली प्रक्रिया आपण आता पूर्ण करत आहोत. जगभरात पहिल्यांदाच हंगामी

कामगार तसेच ऑनलाईन व्यासपीठावरच्या कामगारांना सामाजिक सुरक्षा फायदे दिले जाणार आहेत. या सर्व प्रकारच्या कामगारांना किमान वेतन लागू होणार असून सर्वांचा समावेश कर्मचारी राज्य विमा योजनेत होणार आहे सर्व प्रकारच्या कामांवर स्त्री कर्मचाऱ्यांना ठेवता येणार असून सुयोग्य सुरक्षा व्यवस्था असल्यास रात्रपाळीत देखील स्त्रियांना काम करता येईल. या बरोबरच मालकांवरचा नियम पालनाचा भार कमी करण्यासाठी एकत्रित पंजिकरण व लाइसन्सिंग तसेच ऑनलाईन परताव्याची पद्धत सुरू केली जाईल.

***आर्थिक समावेशन***

**113.** अनुसुचित जाती जमातींसाठी व महिलांसाठी असलेल्या स्टँड अप इंडिया योजनेला पतपुरवठा वाढावा म्हणून यासाठीची किमान आर्थिक क्षमतेची आवश्यकता 25 टक्क्यांवरून 15 टक्क्यांपर्यंत खाली आणावी, तसेच कृषी संबंधित उपक्रमांसाठी कर्जपुरवठा करण्याची व्यवस्था असावी, असा प्रस्ताव मी मांडत आहे.

**114.** सूक्ष्म, लघु तसेच मध्यम उद्योगांना पाठबळ देण्यासाठी आम्ही अनेक पावले उचलली आहेत. या अर्थसंकल्पात या क्षेत्रासाठी मी रुपये 15700 कोटीची तरतूद केली असून ही अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा दुपटीने जास्त आहे.

***4. मानवी भांडवलाला नवचेतना***

**115.** नुकत्याच जाहीर केलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाचे सर्वदूर स्वागत होत आहे.

***शालेय शिक्षण***

**116.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या सर्व घटकांचा अंतर्भाव करण्यासाठी 15000 पेक्षा जास्त शाळांना गुणात्मक बळकटी देण्यात येईल.

या शाळा संबंधित प्रदेशामधल्या आदर्श शाळा बनवून उदाहरण प्रस्तुत करतील. तसेच इतर शाळांना नवीन धोरणाचे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी पूर्ण मदत करतील.

**117.** राज्ये, सेवाभावी संस्था, खाजगी शाळा यांच्या भागीदारी सह शंभर नव्या सैनिकी शाळा सुरू करण्यात येतील.

***उच्चशिक्षण***

**118.** 2019- 20 च्या अर्थसंकल्पात मी देशात उच्च शिक्षण आयोग स्थापन करण्याचा उल्लेख केला होता. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी या वर्षी कायदा आणला जाईल. मानकांची स्थापना, नोंदणी, नियमावली आणि निधी पुरवठा या चार कामांसाठी असलेल्या स्वतंत्र संस्थांचे नियमन करण्याचे काम या आयोगाकडे असेल.

**119.** भारत सरकारच्या पाठिंब्याने विविध शहरांमध्ये अनेक संशोधन संस्था, विद्यापीठे व महाविद्यालये कार्यरत आहेत. उदाहरणार्थ, हैदराबाद मध्ये अशा 40 महत्त्वाच्या संस्था चालू आहेत. या सारख्या आणखी नऊ शहरांमध्ये अशा प्रकारच्या संस्थांची एक औपचारीक यंत्रणा उभी करावी ,ज्यायोगे अशा संस्थांचे कार्य एकमेकांच्या समन्वयाने तर होईलच पण त्याचबरोबर त्यांची स्वायत्तताही अबाधित राहील. या सर्वांना येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन मिळेल व यासाठी आर्थिक तरतूदही केली जाईल.

**120.** लडाखमध्ये सर्व नागरिकांना शिक्षण मिळण्यासाठी मी लेह येथे केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडत आहे.

**121.** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून हाती घेण्याच्या इतर महत्त्वाच्या प्रकल्पांची यादी परिशिष्ट पाच मध्ये दिली आहे.

*अनुसूचित जाती व जमातीचे कल्याण*

**122.** आदिवासी क्षेत्रांमध्ये 750 एकलव्य आदर्श निवासी शाळा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे यातल्या प्रत्येक शाळेच्या उभारणीसाठी लागणारा निधी रुपये 20 कोटींवरून रुपये 38 कोटी पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मी ठेवत आहे. डोंगराळ व दुर्गम भागातील शाळांसाठी हा निधी रुपये 48 कोटी असावा. त्यामुळे आमच्या आदिवासी विद्यार्थ्यांना सशक्त पायाभूत सुविधा मिळू शकतील.

**123.** अनुसूचित जातींसाठी शालांतोत्तर शिष्यवृत्तीची योजना आम्ही पुनर्गठित केली आहे. यासाठी केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीत मी वाढ केली आहे. आम्ही 2025- 26 पर्यंतच्या सहा वर्षांसाठी रुपये 35,219 कोटींची तरतूद केली असून त्याचा फायदा अनुसूचित जातीच्या चार कोटी विद्यार्थ्यांना मिळेल.

***कौशल्यविकास***

**124.** 2016 मध्ये आम्ही राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजना सुरू केली होती. युवकांना अधिकाधिक प्रशिक्षणाच्या संधी मिळाव्यात म्हणून सरकार या प्रशिक्षणार्थी कायद्यात सुधारणा प्रस्तावित करत आहे. अभियंता पदविकाधारकांना व इतर पदवीधरांना शिक्षणोत्तर प्रशिक्षण देण्यासाठी आम्ही राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण योजनेची पुनर्रचना करत आहोत. यासाठी रुपये तीन हजार कोटींपेक्षा जास्त निधीची तरतूद केली आहे.

**125.** कौशल्य अर्हतेचे प्रमाणीकरण, मूल्यमापन व प्रमाणपत्र देण्याचा एक नवीन उपक्रम संयुक्त अरब अमीरात (UAE)च्या सहयोगाने सुरू असून, यात प्रमाणित कामगारांना रोजगार देण्यात येईल. भारत व जपान च्या भागीदारीने एक प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम (टी आय टी पी) सुरू असून यात जपानमधील औद्योगिक व व्यावसायिक कौशल्ये, पद्धती तसेच ज्ञानाचे

हस्तांतरण अपेक्षित आहे. अशा पद्धतीचे उपक्रम आणखी अनेक देशांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येतील.

### 5. ***नवनिर्मिती आणि संशोधन व विकास***

**126.** 2019 च्या अर्थसंकल्पीय भाषणात मी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानाची घोषणा केली होती. या संबंधातील मुद्द्यांचा आम्ही अभ्यास केला असून यासाठी येत्या पाच वर्षांसाठी रुपये 50,000 कोटींची तरतूद केली आहे. यामुळे देशात संशोधनासाठी पोषक वातावरण तयार होऊन देशासाठी महत्त्वाच्या असलेल्या ज्ञानक्षेत्रांमधील संशोधनावर भर दिला जाईल.

**127.** नजीकच्या भूतकाळात डिजिटल आर्थिक व्यवहारांमध्ये अनेक पटीने वाढ झाली आहे.डिजिटल व्यवहारांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी सरकार जी नवी योजना प्रस्तुत करणार आहे, त्यासाठी रुपये 1500 कोटी बाजूला काढून ठेवण्याचा प्रस्ताव मी करत आहे.

**128.** आम्ही एक नवा उपक्रम सुरू करत आहोत- राष्ट्रीय भाषा अनुवाद मिशन (NTLM). शासन तसेच धोरणा संबंधित इंटरनेटवर मिळणारे ज्ञानभांडार सर्व भारतीय भाषांमधून अनुवादित करून उपलब्ध करून देणे, हे यामागचे उद्दिष्ट आहे.

**129.** शासनाच्या अवकाश विभागाची सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी न्यू स्पेस इंडिया लिमिटेड लवकरच पीएसएलव्ही-CS51 चे प्रक्षेपण करणार असून, त्या वेळी अनेक लहान मोठ्या भारतीय उपग्रहांसोबतच ब्राझीलचा ‘अमेझोनिया’ हा उपग्रह अवकाशात सोडला जाईल.

**130.** गगनयान मोहिमेअंतर्गत भारताचे चार अवकाशयात्री रशियामध्ये जेनेरिक स्पेस फ्लाईट या महत्वाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेत आहेत. पहिल्या मानवरहित अवकाशयानाचे प्रक्षेपण डिसेंबर 2021 मध्ये नियोजित आहे.

131. आपले सागर म्हणजे सजीव तसेच निर्जीव स्त्रोतांची भांडारे आहेत. त्याची व्याप्ती पूर्णपणे समजून घेण्यासाठी आम्ही 'सखोल सागरी मिशन' चा (DSM) आरंभ करणार असून त्यासाठी रुपये 400 कोटींची तरतूद येत्या पाच वर्षांसाठी केली आहे. या अंतर्गत सागर तळाचे सर्वेक्षण, तसेच खोल सागरामधील जैवविविधतेचे संवर्धन केले जाईल.

## 6. *किमान सरकार, कमाल शासन*

132. अध्यक्ष महोदय , आता मी शेवटच्या सहाव्या स्तंभाकडे वळत आहे. आमच्या अनेक महत्त्वाच्या तत्त्वांपैकी एक आहे 'किमान सरकार -कमाल शासन'

133. त्वरित न्यायदानासाठी गेल्या काही वर्षात आम्ही न्यायाधिकरणांमध्ये सुधारणा घडवून आणल्या आहेत. याच प्रकारे पुढे वाटचाल करताना, मी आता न्यायाधिकरणाची कार्यपद्धती आणखी तर्कसंगत बनवण्यासाठी पावले उचलण्याचा प्रस्ताव मांडत आहे.

134. वैद्यकीय सेवेला सहाय्यक असलेल्या 56 प्रकारच्या वैद्यकीय सेवा व्यावसायिकांच्या कार्याला अधिक पारदर्शकता देण्यासाठी आम्ही 'राष्ट्रीय वैद्यक सहाय्यक व्यावसायिक आयोग विधेयक' संसदेत सादर केले आहे. तसेच परिचारिकांच्या कामात पारदर्शकता ,कार्यकुशलता व शासन सुधारणा घडवून आणण्यासाठी 'राष्ट्रीय परिचारिका व सुईण आयोग विधेयक' देखील लवकरच सरकार सादर करणार आहे.

135. सरकारशी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांशी व्यवहार करणाऱ्या तसेच करारबद्ध होणाऱ्यांची व्यवसाय सुलभता वाढवण्यासाठी मी एक सलोखा यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. करारांशी संबंधित तंटे लवकरात लवकर सोडवण्यासाठी याचा उपयोग होईल. यामुळे खासगी गुंतवणूकदार व कंत्राटदारांना प्रोत्साहन मिळेल.

**136.** लवकरच येणारी जनगणना भारताच्या इतिहासातील पहिली डिजिटल जनगणना असणार आहे .या प्रचंड व्याप्ती असलेल्या व मैलाचा दगड ठरणाऱ्या कार्यासाठी मी 2021- 22 या वर्षात रुपये 3,768 कोटींची तरतूद करत आहे.

**137.** गोवा राज्याला पोर्तुगीजांकडून स्वातंत्र्य मिळाल्याचा हीरक महोत्सव साजरा होत आहे. भारत सरकारच्या वतीने मी यासाठी रुपये 300 कोटींचे अनुदान गोवा सरकारला देण्याचा प्रस्ताव ठेवत आहे.

**138.** आसाम व पश्चिम बंगालच्या चहा मळ्यांमध्ये काम करणाऱ्या स्त्री मजूर व त्यांच्या मुलांच्या कल्याणासाठी मी रुपये एक हजार कोटींची तरतूद करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. त्यांच्यासाठी एक विशेष योजना तयार केली जाईल.

***वित्तीय सद्यस्थिती***

**139.** कोविड-19 महामारी च्या प्रभावामुळे या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच महसुलाच्या मिळकतीवर विपरीत परिणाम झाला होता, याकडे मी या प्रतिष्ठित सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते.यामध्ये भर म्हणून देशातील गरीब, महिला, अनुसूचित जाती, जमातीं सारख्या पीडित समुदायांना आवश्यक ती मदत देण्यासाठी केलेल्या खर्चात भरपूर वाढ झाली होती.

**140.** 140. महामारीच्या परिस्थितीत होणाऱ्या बदलांचे निरीक्षण करून आपल्या देशाने वेळोवेळी मध्यम आकाराच्या मदतीचे हप्ते पुरवले होते. अखेरीस आरोग्याची परिस्थिती सुधारली आणि त्यानंतर टाळेबंदी हळूहळू उठवली गेली. त्यावेळी आम्ही सरकारचा खर्च वाढवून देशांतर्गत मागणी वाढविण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम म्हणून 2020 -21 सालच्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाज केलेल्या रुपये 30.42 लाख कोटींच्या खर्चापेक्षा सुधारित खर्चाचा

अंदाज वाढून रुपये 34.50 लाख कोटी झाला आहे. आम्ही खर्चाची गुणवत्ताही कायम राखली आहे. 2020- 21 च्या अर्थसंकल्पीय अंदाजात दर्शवलेल्या रुपये 4.12 लाख कोटींच्या भांडवली खर्च वाढून सुधारित अंदाजात रुपये 4.39 लाख कोटींचा भांडवली खर्च दाखवला आहे.

**141.** 2020-21 च्या सुधारित अंदाजात वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या 9.5 टक्के पर्यंत रोखली आहे. या तुटीच्या भरपाईसाठी आम्ही सरकारी कर्ज, बहू पातळीवरील कर्जे, अल्पबचत निधी व अल्पमुदतीच्या कर्जाचा वापर केला आहे. याशिवाय आम्हाला आणखी रुपये 80,000 कोटी रुपयांची गरज पडू शकेल व त्यासाठी आम्ही येत्या दोन महिन्यात भांडवली बाजारात उतरणार आहोत. अर्थव्यवस्थेला आवश्यक ते प्रोत्साहन देण्यासाठी 2021- 22 साठी आमचा अर्थसंकल्पीय अंदाजित खर्च रुपये 34. 83 लाख कोटी रुपये आहे. यामध्ये रुपये 5.54 लाख कोटींचा भांडवली खर्च समाविष्ट असून 2020 -21 च्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा तो 34.5 टक्क्यांनी जास्त आहे. 2021- 22 च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार वित्तीय तूट, सकल देशांतर्गत उत्पादनाच्या 6.8 टक्के आहे. भांडवली बाजारातून पुढील वर्षात कर्जाची उचल एकूण रुपये 12 लाख कोटी अपेक्षित आहे. आम्ही आखलेल्या वित्तीय एकत्रीकरणाच्या मार्गावरून चालत असताना 2025 -26 पर्यंत वित्तीय तुटीचे प्रमाण कमी होत होत, सकल देशांतर्गत उत्पादनाच्या 4.5 टक्क्यांपर्यंत खाली येणे अपेक्षित आहे. हे वित्तीय एकत्रीकरणाचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रथमतः करदात्यांच्या संख्येत, तसेच नियम पालनाच्या प्रमाणामध्ये वाढ होऊन एकूण करसंकलन वाढवणे , दुसरे म्हणजे, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या व जमिनींसारख्या मालमत्तांमधून येणारी कमाई वाढवणे, हे मार्ग चोखाळले जातील. भारताचा आपत्कालीन निधी सध्याच्या रुपये पाचशे कोटींवरून वाढवून रुपये तीस हजार कोटीपर्यंत नेण्याचा प्रस्ताव मी मांडत असून त्यासाठी वित्तीय विधेयक आणले जाईल.

**142.** 15 व्या वित्त आयोगाच्या मतानुसार आम्ही राज्यांच्या एकूण कर्जावर वर्ष 2021- 22 साठी सकल राज्यांतर्गत उत्पादनाच्या चार टक्क्यांपर्यंत मर्यादा घालत आहोत. या मर्यादेचा काही हिस्सा वाढत्या भांडवली खर्चासाठी राखून ठेवला जाईल. काही शर्तींच्या अधीन राहिल्यास राज्यांची कर्जमर्यादा सकल राज्यांतर्गत उत्पादनाच्या 0.5 टक्क्यांपर्यंत अधिक वाढू शकते. पंधराव्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार वर्ष 2023- 24 पर्यंत राज्यांनी त्यांची वित्तीय तूट सकल राज्यांतर्गत उत्पादनाच्या तीन टक्क्यांपर्यंत खाली आणणे अपेक्षित आहे.

**143.** जुलै 2019- 20 च्या अर्थसंकल्पामध्ये मी विधान 27 मध्ये 'अर्थसंकल्पेतर स्त्रोत' या संकल्पनेची ओळख करून दिली होती. भारत सरकारच्या अनेक योजनांना निधी पुरवठा करण्यासाठी अनेक सरकारी संस्थांनी घेतलेल्या कर्जाचा त्यामध्ये उल्लेख होता. या कर्जाच्या परतफेडीचा भार भारत सरकारवर आहे. माझ्या 2020- 21 च्या अर्थसंकल्पात या विधानाची व्याप्ती वाढवून त्यामध्ये सरकारने फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला(FCI) दिलेल्या कर्जाचा ही समावेश केला. याच दिशेने एक पाऊल पुढे टाकताना मी प्रस्ताव करते, की राष्ट्रीय अल्पबचत निधी कडून फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला(FCI) अनुदानासाठी मिळणारे कर्ज थांबवावे. यासाठी 2020- 21 च्या सुधारित अंदाजात तसेच 2021- 22 च्या अर्थसंकल्पीय अंदाजात तरतूद केलेली आहे. अर्थसंकल्पेतर स्त्रोतांबद्दलची अधिक माहिती परिशिष्ट सहा मध्ये दिली आहे.

**144.** वित्तीय जबाबदारी व अर्थसंकल्प व्यवस्थापन कायद्यानुसार (FRBM) 31 मार्च 2020- 21 पर्यंत वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या तीन टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट होते. परंतु या वर्षी आलेल्या अभूतपूर्व आपत्ती परिस्थिती मुळे झालेल्या विपरित परिणामांमुळे एफ आर बी एम कायद्याच्या कलम 4(5) व 7(3) प्रमाणे विचलन विधान देणे जरूरीचे झाले

आहे. ते मी या कायद्यासंबंधातल्या इतर कागदपत्रांसोबत सभागृहासमोर सादर करत आहे.

146 याआधी सूचित केल्याप्रमाणे, वित्तीय तुटीचे प्रमाण कमी करण्यासाठी केंद्र सरकार ज्या मार्गाने चालत आहे, त्यानुसार FRBM कायद्यामध्ये मी एक सुधारणा सुचवत आहे.

147 9 डिसेंबर 2020 रोजी पंधराव्या वित्त आयोगाने 2021 ते 2026 पर्यंतच्या कालखंडासाठी राष्ट्रपती महोदयांपुढे अंतिम अहवाल सादर केला. सरकारने आयोगाचा हा अहवाल स्पष्टीकरणासह संसदेत सादर केला आहे. यात राज्यांचा पूर्वी असलेला 41 टक्के हिस्सा तसाच ठेवला आहे. वित्तीय संघराज्य वादाप्रती आम्ही कटिबद्ध आहोत आणि त्यामुळे या शिफारसींचे पालन करण्याचा प्रस्ताव ठेवत आहोत. जम्मू-काश्मीरला यापूर्वी राज्याचा दर्जा असल्याने चौदाव्या वित्त आयोगाने त्याला निधी देणे अपेक्षित होते, परंतु आता जम्मू व काश्मीर तसेच लदाखच्या केंद्रशासित प्रदेशाला केंद्राकडून निधी पुरवला जाईल. आयोगाच्या शिफारसीनुसार 2021- 22 साठी 17 राज्यांना महसुली तूटीसाठी रुपये एक 1,18,452 कोटींचे अनुदान देण्याची तरतूद करत आहे. 2020-21 मध्ये हेच अनुदान 14 राज्यांसाठी रुपये 74,340 कोटी होते.

आता मी माझ्या भाषणाच्या भाग ‘ब’ कडे वळत आहे.

## भाग ब

**147.** माननीय सभापती, संपूर्ण जग महामारीने निर्माण केलेल्या गंभीर आव्हानाला आणि त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देत आहे. अतिशय कठीण परीक्षेच्या या कालखंडात जेव्हा अनेक देशांच्या अर्थव्यवस्था पुन्हा सामान्य होण्यासाठी संघर्ष करत आहेत, त्यावेळी आपली जनता आणि उद्योगांनी कमालीच्या चिवटपणाचे दर्शन घडवले आहे.

**148.** यापूर्वी मी उल्लेख केल्याप्रमाणे महामारी पश्चात जगामध्ये एका नव्या क्रमवारीचा उदय होत असल्याचे दिसत आहे, ज्यामध्ये आशिया एक महत्त्वाचे स्थान मिळवण्यासाठी सज्ज झाला आहे आणि त्यामध्ये भारत नेतृत्व करेल. अशा स्थितीमध्ये आपली करप्रणाली पारदर्शक, कार्यक्षम असली पाहिजे आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारी आणि देशात रोजगार निर्मिती करणारी असली पाहिजे. त्याच वेळी आपल्या करदात्यांवर तिचा किमान भार असणे आवश्यक आहे.

> **இயற்றலும் ஈட்டலுங் காத்தலும் காத்த வகுத்தலும் வல்ல தரசு.**
>
> \- **திருக்குறள்385**

> राजा/ राज्यकर्ता तो असतो जो संपत्तीची निर्मिती आणि प्राप्ती करतो, रक्षण करतो आणि सामान्यांच्या कल्याणासाठी तिचे वाटप करतो.
>
> \- थिरुक्कुरल 385

***प्रत्यक्ष कर प्रस्ताव***

**149.** ही बाब लक्षात घेऊन आपल्या करदात्यांच्या आणि अर्थव्यवस्थेच्या हितासाठी आमच्या सरकारने सुधारणांची एक मालिका सुरू केली. महामारीच्या काही महिने आधी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आम्ही

कॉर्पोरेट कराच्या दरात कपात करून तो जगातील सर्वात कमी पातळीवर आणला. लाभांश वितरण कर देखील रद्द केला. सवलतींमध्ये वाढ करून लहान करदात्यांवर ओझे कमी केले. 2020 मध्ये करविवरणपत्र दाखल करणाऱ्यांच्या संख्येत आश्चर्यकारक वाढीची नोंद होऊन 2014 मध्ये असलेल्या 3.31 कोटींवरून ती 2020 मध्ये 6.48 कोटींवर पोहोचली.

**150.** प्रत्यक्ष कर प्रशासनामध्ये आम्ही अलीकडेच ओळखविरहित मूल्यांकन आणि ओळखविरहित दाद मागण्याच्या व्यवस्थेचा ही समावेश केला. आता मी कर प्रशासन सुलभ करणाऱ्या, अनुपालन सोपे करणाऱ्या आणि वाद कमी करणाऱ्या पावलांची माहिती देते.

***ज्येष्ठ नागरिकांना दिलासा***

**151.** आपल्या देशाच्या ज्येष्ठ नागरिकांना प्रणाम करून मी माझ्या प्रत्यक्ष कर प्रस्तावांची सुरुवात करते. यापैकी बऱ्याच जणांनी स्वतःच्या अनेक मूलभूत गरजांच्या पूर्ततेकडे दुर्लक्ष करत राष्ट्र उभारणीसाठी प्रयत्न केले आहेत.

**152.** आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या 75व्या वर्षात जेव्हा आपण नव्या जोमाने आपले प्रयत्न सुरू ठेवत आहोत त्यावेळी आपल्या देशातील 75 वर्षांच्या आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या ज्येष्ठ नागरिकांवर कराचे ओझे आम्ही कमी करत आहोत. ज्या ज्येष्ठ नागरिकांना केवळ निवृत्तीवेतन आणि व्याज यांच्या माध्यमातून उत्पन्न मिळत आहे, त्यांना प्राप्तीकर विवरणपत्र दाखल करण्याच्या कक्षेतून वगळण्याचा माझा प्रस्ताव आहे. त्यांना हे उत्पन्न चुकते करणारी बँक त्यांच्या उत्पन्नावरील आवश्यक कर कापून घेईल.

***प्राप्तिकर प्रक्रियेच्या वेळेत कपात***

**153.** माननीय सभापती, सध्या एखाद्या प्रकरणाचे मूल्यांकन सहा वर्षांपर्यंत आणि करविषयक घोटाळ्याच्या गंभीर प्रकरणात दहा वर्षांपर्यंत

करता येते. यामुळे करदाते प्रदीर्घ काळ अनिश्चिततेच्या सावटामध्ये राहातात.

**154.** म्हणूनच मी असे प्रस्तावित करते पुन्हा मूल्यांकन करण्याचा कालावधी सहा वर्षांवरून तीन वर्षांपर्यंत कमी करावा. कर चुकवण्याच्या गंभीर प्रकरणात देखील एका वर्षात 50 लाख रुपये किंवा त्यापेक्षा जास्त कर चुकवला असेल तर प्राप्तिकर विभागाच्या सर्वोच्च पातळीवर असलेल्या प्रधान मुख्य आयुक्तांच्या परवानगीनंतरच त्याचे पुन्हा मूल्यांकन 10 वर्षांपर्यंत करता येईल.

***वाद निवारण समितीची स्थापना***

**155.** माननीय सभापती, सध्याच्या कर प्रणालीवर परिणाम करणाऱ्या करविषयक वाद कमी करणे हे या सरकारचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**156.** दीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्याची करदात्यांना संधी देण्यासाठी आणि त्यांना त्यांचा वाया जाणारा वेळ आणि पैसा यापासून दिलासा देण्यासाठी सरकारने 'प्रत्यक्ष कर विवाद से विश्वास' ही योजना तयार केली आहे. या योजने अंतर्गत एक लाख दहा हजारांपेक्षा जास्त करदात्यांनी 85,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या करविषयक वादांचे निराकरण करण्याचा पर्याय स्वीकारला असल्याने या योजनेला करदात्यांकडून सर्वोत्तम प्रतिसाद मिळत आहे.

**157.** लहान करदात्यांचे करविषयक वाद आणखी कमी करण्यासाठी, वाद निवारण समिती स्थापन करण्याचा माझा प्रस्ताव आहे, कार्यक्षमता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखण्यासाठी ती ओळखविरहित असेल. 50 लाख रुपयांपर्यंतचे कर आकारणी योग्य उत्पन्न असलेल्या आणि 10 लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नाचा वाद असलेल्या कोणालाही या समितीकडे दाद मागता येईल.

***ओळखविरहित आयटीएटी***

158. अनुपालन सोपे करण्यासाठी आणि भेदभाव टाळण्यासाठी करआकारणीची प्रक्रिया ओळखविरहित करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. सरकारने यापूर्वीच ओळखविरहित मूल्यांकन आणि दाद मागण्याची सुविधा यावर्षी सुरू केली आहे.

159. प्राप्तिकर अपिलीय न्यायाधिकरण ही प्राप्तिकरासंदर्भात दाद मागण्याची पुढील पातळी असेल. हे न्यायाधिकरण ओळखविरहित करण्याचा माझा प्रस्ताव आहे. राष्ट्रीय ओळखविरहित प्राप्तिकर अपिलीय न्यायाधिकरण केंद्र (आयटीएटी) स्थापन करणार आहोत. हे न्यायाधिकरण आणि अपीलकर्ता यांच्यातील सर्व संवाद इलेक्ट्रॉनिक असतील. ज्यावेळी वैयक्तिक सुनावणीची गरज असेल त्यावेळी ती व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून करण्यात येईल.

***अनिवासी भारतीयांना सवलत***

160. ज्यावेळी अनिवासी भारतीय भारतात परत येतात, त्यावेळी त्यांच्या परदेशी निवृत्तीवेतन खात्यांमध्ये जमा झालेल्या उत्पन्नासंदर्भात त्यांच्यासमोर समस्या निर्माण होतात. करआकारणीच्या कालावधीतील विसंगतीमुळे ही समस्या निर्माण होत असते. परदेशी अधिकार क्षेत्रांतर्गत भारतीय करांसाठी सवलत मिळण्यातही त्यांना अडचणी येतात. त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी मी दुहेरी करआकारणी रद्द करण्याचे नियम अधिसूचित करण्याचे प्रस्तावित करत आहे.

***लेखापरीक्षणापासून सवलत***

161. सध्या जर तुमची उलाढाल एक कोटीपेक्षा जास्त असेल तर तुम्हाला तुमच्या खात्याचे लेखापरीक्षण करून घ्यावे लागते. जे लोक 95 टक्क्यांपेक्षा जास्त डिजिटल व्यवहार करतात त्यांच्यासाठी फेब्रुवारी 2020च्या अर्थसंकल्पात मी या कर लेखापरीक्षणाच्या मर्यादेत 5 कोटींपर्यंत वाढ केली होती. डिजिटल व्यवहारांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी आणि

अनुपालनाचे दडपण कमी करण्यासाठी अशा व्यक्तींच्या कर लेखापरीक्षणाची मर्यादा 5 कोटीवरून 10 कोटी वाढवण्याचा माझा प्रस्ताव आहे.

***लाभांशासाठी दिलासा***

**162.** यापूर्वीच्या अर्थसंकल्पात गुंतवणुकीला चालना देण्यासाठी मी लाभांश वितरण कर(डीडीटी) रद्द केला होता. समभागधारकांच्या हातात येणारा लाभांश करपात्र करण्यात आला होता. आता अनुपालन सोपे करण्याच्या उद्देशाने मी असे प्रस्तावित करत आहे की आरईआयटी/ आयएनव्हीआयटी यांना चुकता करण्यात येणारा लाभांश टीडीएसमधून वगळण्यात यावा. त्याशिवाय आगाऊ कर भरण्यासाठी या लाभांशाच्या रकमेची मोजणी योग्य प्रकारे करणे समभागधारकांना शक्य होणार नसल्याने केवळ लाभांशाची घोषणा/ चुकारा झाल्यावरच लाभांशाच्या उत्पन्नावर आगाऊ कर लागू करण्यात यावा, असा माझा प्रस्ताव आहे.

***पायाभूत सुविधा क्षेत्रात परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे***

**163.** पायाभूत सुविधा क्षेत्रात परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आम्ही गेल्या अर्थसंकल्पात विशिष्ट अटींवर परदेशी सॉवरिन वेल्थ फंड आणि पेन्शन फंडना त्यांच्या भारतीय पायाभूत सुविधा क्षेत्रातील गुंतवणुकीवरील उत्पन्नावर 100% कर सवलत दिली होती. आमच्या असे निदर्शनास आले आहे की अशा प्रकारच्या काही परदेशी निधींना या अटींची पूर्तता करण्यात अडचणी येत आहेत. भारतात अशा निधींमधून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याच्या उद्देशाने खाजगी निधीला प्रतिबंध, व्यावसायिक व्यवहारांवर निर्बंध आणि पायाभूत सुविधांमध्ये थेट गुंतवणूक यांच्याशी संबंधित काही अटी शिथिल करण्याचा माझा प्रस्ताव आहे.

**164.** झिरो कूपन बाँडच्या माध्यमातून पायाभूत सुविधांना अर्थसाहाय्य करण्यास परवानगी देण्यासाठी नोटीफाईड इन्फ्रास्ट्रक्चर डेट फंड्सना झिरो कूपन बाँड्स जारी करून निधी उभारण्यासाठी पात्र ठरवण्याचा माझा प्रस्ताव आहे.

***परवडण्याजोगी घरे/ भाड्याची घरे***

**165.** 'सर्वांना घरे' आणि परवडणारी घरे हे या सरकारसाठी प्राधान्याचे क्षेत्र आहे. जुलै 2019 मध्ये सादर केलेल्या अर्थसंकल्पात परवडणाऱ्या घरांच्या खरेदीसाठी मी व्याजामध्ये 1.5 लाखांपर्यंतची अतिरिक्त कपातीची सुविधा दिली होती. यासाठीच्या पात्रतेच्या कालावधीत आणखी एक वर्षाने वाढ करून तो 31 मार्च 2022 पर्यंत वाढवण्याचा माझा प्रस्ताव आहे. त्यामुळे परवडणाऱ्या घरांच्या खरेदीसाठी 31 मार्च 2022 पर्यंत घेतल्या जाणाऱ्या कर्जावर अतिरिक्त 1.5 लाख कपात उपलब्ध असेल.

**166.** त्याशिवाय परवडणाऱ्या घरांचा पुरवठा सुरू ठेवण्यासाठी, परवडणाऱ्या घरांच्या प्रकल्पांना आणखी एका वर्षासाठी 31 मार्च 2022 पर्यंत करातील सवलतीचा लाभ देण्याचा माझा प्रस्ताव आहे.

**167.** स्थलांतरित मजुरांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. यासाठी अधिसूचित परवडणाऱ्या घरांच्या प्रकल्पांना करामध्ये सवलत देण्याचा माझा प्रस्ताव आहे.

***आयएफएससींना कर सवलत***

**168.** या भाषणाच्या अ भागामध्ये उल्लेख केल्यानुसार गिफ्ट सिटी (गुजरात इंटरनॅशनल फायनॅन्शियल टेक सिटी) एक जागतिक आर्थिक केंद्र बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. यापूर्वीच दिलेल्या कर सवलतींव्यतिरिक्त विमाने भाड्याने देणाऱ्या कंपन्यांना भांडवली लाभासाठी कर सवलती, परदेशी कंपन्यांना चुकते केलेल्या विमानभाड्यासाठी करात सूट, आयएफएससी मधील परदेशी निधीचे पुनर्स्थानांतरण करण्यासाठी करसवलत आणि आयएफएससीस्थित परदेशी बँकांच्या गुंतवणूक विभागाला करातून सूट देण्याची परवानगी यांचा समावेश करण्याचा माझा प्रस्ताव आहे.

***विवरणपत्रे आधीच दाखल करणे***

169. माननीय सभापती, करदात्यांसाठी अनुपालन सुलभ करण्याच्या उद्देशाने वेतनाचे उत्पन्न, कराचे चुकारे, टीडीएस इत्यादींचे तपशील प्राप्तिकर विवरणपत्रामध्ये आधीपासूनच भरलेले असतात. ही प्रक्रिया आणखी सुलभ करण्यासाठी सूचीबद्ध रोख्यांद्वारे मिळणारा भांडवली लाभ, लाभांशाचे उत्पन्न आणि बँका, टपाल कार्यालयांमधून मिळणारे व्याज यांचे तपशील देखील आधीपासून भरता येतील.

***लहान विश्वस्त मंडळांना दिलासा***

170. शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये चालवणाऱ्या लहान धर्मादाय विश्वस्त मंडळांवरील अनुपालनाचा ताण कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आतापर्यंत वार्षिक निधी एक कोटीपेक्षा जास्त नाही अशा संस्थांना त्यातून वगळण्यात येते. या मर्यादेत 5 कोटींपर्यंत वाढ करण्याचे मी प्रस्तावित करत आहे.

***कामगार कल्याण***

171. आमच्या असे निदर्शनास आले आहे की काही नियोक्ते त्यांच्या कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी, वेतन निधी आणि इतर सामाजिक सुरक्षा निधी त्यांच्या वेतनातून कापत आहेत मात्र, त्यांचा भरणा निर्धारित वेळेत करत नाहीत. याचा अर्थ कर्मचाऱ्यांना मिळणारे व्याज किंवा उत्पन्न याबाबत नुकसान सहन करावे लागत आहे. ज्यावेळी नियोक्ता काही काळाने आर्थिकदृष्ट्या कमकुवत बनतो, त्यावेळी भरणा न झाल्याने कर्मचाऱ्यांचे कायमस्वरुपी नुकसान होते.

172. कर्मचाऱ्यांच्या निधीचा भरणा वेळेत व्हावा यासाठी कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा नियोक्त्याने उशिराने केलेला भरणा हा त्या कर्मचाऱ्याच्या वेतनातील कपातीसाठी ग्राह्य मानला जाणार नाही, याचा मी पुनरुच्चार करत आहे.

***स्टार्ट अप्ससाठी प्रोत्साहन लाभ***

**173.** स्टार्ट अप्सना प्रोत्साहन लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने करामध्ये सवलतीचा लाभ घेण्यासाठीच्या पात्रतेचा कालावधी आणखी एक वर्षाने वाढवून तो 31 मार्च 2022 पर्यंत करण्यात येत आहे. त्याशिवाय स्टार्ट अप्सना निधी पुरवठ्यामध्ये प्रोत्साहन लाभ देण्यासाठी स्टार्ट अप्समधील गुंतवणुकीला 31 मार्च 2022 पर्यंत आणखी एक वर्षाकरिता भांडवली लाभामधून वगळण्याचा माझा प्रस्ताव आहे.

***अप्रत्यक्ष कर प्रस्ताव***

***जीएसटी***

**174.** माझ्या अप्रत्यक्ष कर प्रस्तावांची माहिती द्यायला सुरुवात करण्यापूर्वी मी जीएसटी संदर्भात सभागृहाला माहिती देते. जीएसटीला आता चार वर्षे झाली आहेत आणि तो आणखी सुगम करण्याकरिता आम्ही अनेक पावले उचलली आहेत. यापैकी काही उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत:

i. एसएमएसद्वारे शून्य परतावा,

ii. लहान करदात्यांसाठी तिमाही परतावा आणि मासिक चुकारा,

iii. इलेक्ट्रॉनिक इन्वॉईस प्रणाली,

iv. व्हॅलिडेटेड इनपुट टॅक्स स्टेटमेंट,

v. प्री- फील्ड एडिटेबल जीएसटी रिटर्न आणि

vi. रिटर्न फायलिंगचे स्टॅगरिंग.

जीएसटीएन प्रणालीच्या क्षमतेत देखील वाढ करण्यात आली आहे. कर चुकवणारे आणि बनावट देयके तयार करणाऱ्यांना शोधून काढण्यासाठी आम्ही सखोल विश्लेषण प्रणाली आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर देखील सुरू केला आहे आणि त्यांच्या विरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे.

**175.** ही फलनिष्पत्तीच सर्व काही कथन करत आहे. गेल्या काही महिन्यात आम्ही विक्रमी संकलन केले आहे.

**176.** जीएसटी परिषदेने अतिशय परिश्रमपूर्वक वादग्रस्त मुद्यांचे निराकरण केले आहे. जीएसटी आणखी सुलभ करण्यासाठी आणि त्यामधील इन्वर्टेड ड्युटी स्ट्रक्चरसारख्या विसंगती दूर करण्यासाठी शक्य असेल ते प्रत्येक पाऊल उचलण्यात येईल, अशी ग्वाही मी या परिषदेची अध्यक्ष म्हणून सभागृहाला देत आहे.

***सीमाशुल्क तर्कसंगत करणे***

**177.** स्थानिक उत्पादनाला चालना देणे आणि भारताला जागतिक मूल्य साखळीमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी आणि निर्यातीत वाढ करण्यासाठी मदत करणे ही आपल्या सीमाशुल्क धोरणाची दोन उद्दिष्टे असली पाहिजेत. आता आपला भर कच्चा माल सहजतेने मिळवण्यावर आणि मूल्यवर्धित उत्पादनांची निर्यात करण्यावर असला पाहिजे.

**178.** याच उद्देशाने आम्ही गेल्या वर्षी कालबाह्य झालेल्या 80 सवलती रद्द करून सीमाशुल्क संरचनेमध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू केली. या सुधारणेबाबत मागवलेल्या शिफारशींना अभूतपूर्व प्रतिसाद दिल्याबद्दल मी सर्वांचेच आभार मानते. यावर्षीच्या 400 हून जास्त जुन्या सवलतींचा आढावा घेण्याचे मी प्रस्तावित करत आहे. सखोल विचारविनिमय करून आम्ही ही प्रक्रिया सुरू करणार आहोत आणि 1 ऑक्टोबर 2021 पासून अडथळे विरहित सुधारित सीमाशुल्क संरचना व्यवहारात आणणार आहोत. सीमाशुल्कामधील कोणतीही नवी सवलत यापुढच्या काळात ती जारी केलेल्या तारखेपासून पुढील दोन वर्षे 31 मार्चपर्यंत लागू राहील, असा देखील माझा प्रस्ताव आहे.

***इलेक्ट्रॉनिक आणि मोबाईल फोन उद्योग***

**179.** स्थानिक इलेक्ट्रॉनिक उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. आपण आता मोबाईल फोन आणि चार्जर यांसारख्या उत्पादनांची निर्यात

करू लागलो आहोत. अधिक मूल्यवर्धनासाठी आम्ही चार्जर आणि मोबाईलच्या काही भागांवरील सवलत बंद करत आहोत. मोबाईलच्या काही भागांवर आता शून्य दराऐवजी 2.5 टक्के इतकी नाममात्र आकारणी होईल.

***लोखंड आणि पोलाद***

**180.** लोखंड आणि पोलादाच्या दरात झपाट्याने वाढ झाल्यामुळे एमएसएमई आणि इतर उद्योगांना मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. म्हणूनच बिगर मिश्रधातू, मिश्रधातू आणि पोलादाच्या सेमी, फ्लॅट आणि लाँग उत्पादनांवरील सीमा शुल्कात एकसमान 7.5% कपात करत आहोत. धातू पुनर्वापर करणाऱ्यांना ज्यामध्ये बहुतेक एमएसएमई आहेत त्यांना दिलासा देण्यासाठी मी भंगारातील पोलादावरील सीमाशुल्क 31 मार्च 2022 पर्यंत काढून टाकत आहे. त्याचबरोबर काही विशिष्ट पोलाद उत्पादनांवरील एडीडी आणि सीवीडी मी काढून टाकत आहे. तसेच तांब्याचा पुनर्वापर करणाऱ्यांना दिलासा देण्यासाठी तांब्याच्या भंगारावरील सीमाशुल्कात 5%वरून 2.5% अशी कपात करत आहे.

***वस्त्रोद्योग***

**181.** वस्त्रोद्योग क्षेत्र रोजगाराची निर्मिती करते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे योगदान देते. मानवनिर्मिती कापडासाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालावरील शुल्क तर्कसंगत करण्याची गरज आहे. आम्ही आता नायलॉन शृंखला पॉलीएस्टर आणि इतर मानवनिर्मित धाग्यांच्या पातळीवर आणत आहोत. आम्ही कॅप्रोलॅक्टम, नायलॉन चिप्स आणि नायलॉन फायबर आणि सूतावरील बीसीडी दर एकसमानतेने कमी करून ते 5% वर आणत आहोत. याचा फायदा वस्त्रोद्योग, एमएसएमई आणि निर्यातीला देखील होणार आहे.

***रसायने***

**182.** स्थानिक मूल्यवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अडथळे दूर करण्यासाठी आम्ही रसायनांवरील सीमाशुल्काच्या दरांच्या मोजमापात सुधारणा केली आहे. इतर जिन्नसांशिवाय आम्ही नॅप्थावरील सीमाशुल्कात कपात करून ती 2.5 टक्के केली आहे.

***सोने आणि चांदी***

**183.** सोने आणि चांदीवर सध्या 12.5% मूलभूत सीमाशुल्क आहे. जुलै 2019 मध्ये या शुल्कात 10% वरून वाढ केल्यावर या मौल्यवान धातूचे दर झपाट्याने वाढले. या दरांना पूर्वीच्या पातळीवर आणण्यासाठी आम्ही सोने आणि चांदीवरील सीमाशुल्क तर्कसंगत बनवत आहोत.

***नूतनक्षम उर्जा***

**184.** भारतात सौर उर्जेचे भवितव्य उज्ज्वल असल्याचे आम्ही अ भागात आधीच नमूद केले आहे. स्थानिक क्षमतेत वाढ करण्यासाठी आम्ही सौर सेल आणि सौर पॅनेल यांच्या टप्प्याटप्प्यातील उत्पादनाविषयक योजना जाहीर करणार आहोत. सध्या स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही सौर इन्वर्टरवरील सीमाशुल्क 5 टक्क्यांवरून 20 टक्के आणि सौर कंदिलावरील शुल्क 5 टक्क्यांवरून 15 टक्के करत आहोत.

***महाकाय यंत्र सामग्री आणि स्वयंचलित वाहनाचे सुटे भाग***

**185.** अवजड यंत्रसामग्रीचे देशांतर्गत उत्पादन करण्यास मोठा वाव आहे. दरम्यानच्या काळात आम्ही त्याच्या दराच्या स्वरुपाचा आम्ही समावेशक पद्धतीने आढावा घेऊ. मात्र, आम्ही काही विशिष्ट वस्तूंवरील सीमाशुल्काच्या दरात तातडीने सुधारणा करत आहोत. टनेल बोअरिंग मशीनवरील शुल्काची सवलत रद्द करण्याचा आमचा प्रस्ताव आहे. या मशीनवर 7.5% सीमाशुल्क आणि त्याच्या सुट्या भागांवर 2.5% सीमाशुल्क आकारले जाईल. स्वयंचलित वाहनांच्या काही विशिष्ट भागांवरील सीमाशुल्कात आम्ही वाढ करून आम्ही ते 15% करून स्वयंचलित वाहनांच्या सामान्य दरांच्या पातळीवर आणत आहोत.

***एमएसएमई उत्पादने***

**186.** एमएसएमईंना लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही विशिष्ट बदल प्रस्तावित करत आहोत. स्टीलचे स्क्रू आणि प्लॅस्टिक बिल्डर वेअरवरील शुल्क 10 टक्क्यांवरून वाढवून 15 टक्के करण्याचा आमचा प्रस्ताव आहे. प्रॉन फीडवरील शुल्क 5 टक्क्यांवरून 15 टक्के करण्याचा प्रस्ताव आहे. वस्त्रोद्योग, चामडे आणि हस्तकला वस्तूंच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही सीमाशुल्क मुक्त वस्तूंना आयातीसाठी दिलेली शुल्कमुक्ती आम्ही तर्कसंगत करत आहोत. यापैकी बहुतेक वस्तू आपल्या एमएसएमईकडून देशात तयार केल्या जातात. विशिष्ट प्रकारच्या चामड्यांचे बऱ्याच एमएसएमईकडून मोठ्या प्रमाणावर आणि दर्जेदार उत्पादन होत असल्याने या चामड्यांवर सीमाशुल्कात दिलेली सवलत आम्ही काढून टाकत आहोत. तयार कृत्रिम रत्नांच्या देशांतर्गत प्रक्रियांना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही त्यांच्या सीमाशुल्कावर वाढ करत आहोत.

***कृषी उत्पादने***

**187.** शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही कापसावरील सीमाशुल्कात शून्यावरून 10 टक्के इतकी वाढ करत आहोत आणि कच्चे रेशीम आणि रेशीम सूत यावरील शुल्कात 10 टक्कयांवरून 15 टक्के इतकी वाढ करत आहोत. आम्ही डिनेचर्ड ईथाईल अल्कोहोलवरील एन्ड यूज आधारित सवलत बंद करत आहोत. मेझ ब्रान ( मका धान्याच्या साली), राईस ब्रान ( धानाचे तूस) या तेलांच्या वड्या आणि पशुखाद्यातील पूरक घटकांवरील दरांच्या मोजणीमध्ये एकसमान सुधारणा करत आहोत.

**188.** आपल्या कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी कृषी पायाभूत सुविधांमध्ये तातडीने सुधारणा करण्याची गरज आहे. त्याच वेळी कृषी उत्पादनाची साठवणूक आणि प्रक्रिया प्रभावी पद्धतीने करणे देखील अत्यावश्यक आहे. यामुळे आपल्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात आणखी वाढ होणार आहे. यासाठी संसाधने निश्चित करण्याच्या उद्देशाने मी काही ठराविक जिन्नसांवर कृषी पायाभूत आणि विकास अधिभार लागू करत

आहे. मात्र, हा अधिभार लागू करत असताना त्याचा अतिरिक्त भार ग्राहकांवर पडणार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत.

***प्रक्रियांना तर्कसंगत करणे आणि अनुपालन सुलभ करणे***

**189.** एडीडी आणि सीव्हीडी शुल्कांच्या न्याय्य उपयोजनासाठी आम्ही त्यांच्याशी संबंधित तरतुदींमध्ये काही बदल प्रस्तावित करत आहोत. सीमाशुल्क विभागाच्या संपूर्ण चौकशीसाठी आम्ही विशिष्ट कालमर्यादा निर्धारित करत आहोत. 2020 मध्ये आम्ही तुरंत कस्टम्स प्रक्रिया सुरू केली होती ज्यामध्ये ओळख विरहित, कागदविरहित आणि संपर्कविरहित सीमाशुल्क विभागाच्या उपाययोजनांचा समावेश होता सप्टेंबर 2020 पासून आम्ही ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ रूल्स ऑफ ओरिजिनसाठी नव्या प्रक्रियेची अंमलबजावणी सुरू केली आहे. यामुळे एफटीएच्या गैरवापराला आळा घालण्यास मदत झाली आहे.

**190.** प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांमध्ये प्रस्तावित केलेल्या बदलांचे तपशील माझ्या भाषणाच्या प्रतिसोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दिले आहेत.

**191.** सभापती महोदय, हे बोलून मी हा अर्थसंकल्प या सभागृहाकडे सोपवत आहे.

**<u>अर्थसंकल्पीय भाषणाच्या अ भागाचे परिशिष्ट</u>**

**परिशिष्ट-I**

## आरोग्य आणि निरोगी जीवन – खर्च

*(कोटींमध्ये)*

| **मंत्रालय/ विभाग** | **प्रत्यक्ष 2019-20** | **अर्थसंकल्पीय खर्च 2020-21** | **अर्थसंकल्पीय खर्च 2021-22** |
|---|---|---|---|
| **आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग** | 62,397 | 65,012 | 71,269 |
| **आरोग्य संशोधन विभाग** | 1,934 | 2,100 | 2,663 |
| **आयुष मंत्रालय** | 1,784 | 2,122 | 2,970 |
| **कोविड संबंधित विशेष तरतुदी** | | | |
| *लसीकरण* | | | 35,000 |
| **पेयजल आणि स्वच्छता विभाग** | 18,264 | 21,518 | 60,030 |
| पोषण | 1,880 | 3,700 | 2,700 |
| पाणी आणि स्वच्छता यांसाठी FC | | | 36,022 |
| FC Grants for Health | | | 13,192 |
| **एकूण** | **86,259** | **94,452** | **2,23,846** |

**परिशिष्ट -II**

***महत्वाचे प्रकल्प: रस्ते आणि महामार्ग***

प्रमुख द्रुतगती मार्ग/ कॉरीडॉर

- दिल्ली- मुंबई द्रुतगती मार्ग :उर्वरित 260 किमी मार्गाच्या कामासाठीची प्रक्रिया 31.3.2021पूर्वी सुरु करण्यात येईल.
- बेंगलूरु – चेन्नई द्रुतगती मार्ग: 278 किमीसाठी चालू वित्तीय वर्षात कंत्राटदार निवडण्यात येईल. निर्मिती कार्याला 2021-22मध्ये सुरवात होईल.
- दिल्ली- डेहराडून इकॉनॉमिक कॉरीडॉर : 210 किमी कॉरीडॉर साठीच्या कामाची प्रक्रिया चालू वित्तीय वर्षात सुरु करण्यात येईल. निर्मिती कार्याला 2021-22मध्ये सुरवात होईल.
- कानपूर- लखनौ द्रुतगती मार्ग : राष्ट्रीय महामार्ग 27 ला पर्यायी मार्ग देणाऱ्या 63 किमी द्रुतगती मार्गाचे काम 2021-22 मध्ये सुरु होणार.
- चेन्नई- सालेम कॉरीडॉर : 277 किमीच्या द्रुतगती मार्गाचे बांधकाम 2021-22 मध्ये सुरु होणार.
- रायपुर- विशाखापट्टणम : छत्तीसगड,ओदिशा आणि उत्तर आंध्रप्रदेश मधून जाणारा 464 किमी मार्गासाठी कंत्राटदार चालू वर्षात निवडण्यात येईल. बांधकामाला 2021-22 मध्ये सुरवात होईल.
- अमृतसर- जामनगर : 2021-22 मध्ये बांधकामाला सुरवात होईल.
- दिल्ली- कटरा: 2021-22 मध्ये बांधकामाला सुरवात होईल

*सर्व नव्या चार आणि सहा पदरी महामार्गावर स्पीड रडार, बदलते संदेश देणारे साईन बोर्ड, जीपीएस आधारित रिकव्हरी व्हॅन्स यासह आधुनिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली बसवण्यात येईल.*

**परिशिष्ट -III**

## निर्गुंतवणूक / धोरणात्मक निर्गुंतवणूक धोरणाची ठळक वैशिष्टे

### उद्दिष्टे

a) वित्तीय संस्थांसह केंद्र सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमांची संख्या कमी करत खाजगी क्षेत्रासाठी अधिक गुंतवणुकीला वाव देणे.

b) निर्गुंतवणूकीनंतर केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमांसाठी/ वित्तीय संस्थांसाठी, खाजगी भांडवल, तंत्रज्ञान आणि उत्तम व्यवस्थापन प्रथा याद्वारे आर्थिक विकास साधला जाईल. आर्थिक विकास आणि नव्या रोजगारात याचे योगदान राहील.

c) निर्गुंतवणूकीतून मिळालेल्या रकमेद्वारे विविध सामाजिक क्षेत्रे आणि सरकारच्या विकासात्मक कार्यक्रमाना वित्तीय पाठबळ दिले जाईल.

### धोरणाची वैशिष्ट्ये

a) सीपीएसई, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका आणि सार्वजनिक क्षेत्रातल्या विमा कंपन्याचा धोरणात समावेश

b) विविध क्षेत्रांचे धोरणात्मक आणि बिगर धोरणात्मक असे वर्गीकरण

c) धोरणात्मक क्षेत्रांचे वर्गीकरण असे आहे:

   i) अणू उर्जा, अंतराळ आणि संरक्षण

   ii) वाहतूक आणि टेलीकम्युनिकेशन

   iii) उर्जा, पेट्रोलियम, कोळसा आणि इतर खनिजे

   iv) बँकिंग, विमा आणि वित्तीय सेवा

d) धोरणात्मक क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमांची उपस्थिती अतिशय कमी राहील. धोरणात्मक क्षेत्रातल्या उर्वरित सीपीएसईचे खाजगीकरण किंवा विलीनीकरण केले जाईल किंवा बंद करण्यात येतील.

e) बिगर धोरणात्मक क्षेत्रात सीपीएसईचे खाजगीकरण करण्यात येईल किंवा बंद करण्यात येतील.

**परिशिष्ट - IV**

# कृषी वस्तूंची किमान आधारभूत किंमतीने खरेदी

| वर्ष | गहू | | तांदूळ | | कापूस | | ताग | | डाळी | तेलबिया आणि खोबरे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एमएसपी मूल्य (कोटी रुपये) | लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या (लाख) | एमएसपी मूल्य (कोटी रुपये) | लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या (लाख) | एमएसपी मूल्य (कोटी रुपये) | लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या (लाख) | एमएसपी मूल्य (कोटी रुपये) | लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या (लाख) | एमएसपी मूल्य (कोटी रुपये) | एमएसपी मूल्य (लाख |
| 2010-11 | 24764.3 | उपलब्ध नाही | 52573.04 | उपलब्ध नाही | - | - | - | - | 1.75 | 149.03 |
| 2011-12 | 33152 | उपलब्ध नाही | 58084.48 | उपलब्ध नाही | 14 | 0.02 | 47.7 | 0.46 | 0.005 | 1.52 |
| 2012-13 | 49020.18 | उपलब्ध नाही | 65039.28 | उपलब्ध नाही | 4797 | 7.3 | 140.19 | 1.15 | 407.22 | 394.06 |
| 2013-14 | 33874.20 | उपलब्ध नाही | 63927.65 | उपलब्ध नाही | 90 | 0.14 | 53.98. | 0.5 | 235.86 | 1626.39 |
| 2014-15 | 39232.20 | उपलब्ध नाही | 66948.00 | उपलब्ध नाही | 18506 | 29.5 | 6.56 | 0.06 | 1128.93 | 45.52 |
| 2015-16 | 40727.60 | उपलब्ध नाही | 73981.90 | 73.08 | 1825 | 1.91 | - | - | - | 15.90 |
| 2016-17 | 35015.53 | 20.47 | 85802.73 | 76.85 | - | - | 28.79 | 0.17 | 1039.39. | 946.71 |
| 2017-18 | 50089.00 | 31.87 | 90397.86 | 72.31 | 898 | 0.88 | 172.16 | 1.22 | 8566.13 | 5072.73 |
| 2018-19 | 6204.33 | 38.77 | 116839.47 | 96.94 | 2976 | 2.38 | 66.79 | 0.26 | 20145.60 | 7091.11 |
| 2019-20 | 62802.88 | 35.57 | 141928.08 | 124.59 | 28500 | 21.5 | 56.24 | 0.55 | 8284.45 | 8305.06 |
| 2020-21 | 75059.60 | 43.36 | 172752** | 154** | 25974* | 18.26* | 2.99 | 0.01 | 10530.20 | 3647.11 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| * 27.01.21पर्यंत ;<br>**अनुमानित मूल्य | | | | | | | | |

*एन ए = उपलब्ध नाही*

***राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून शिक्षणासंदर्भातले उपक्रम***

- सर्व शालेय शिक्षकांसाठी, एनपीएसटीच्या स्वरुपात मानक विकसित करण्यात येणार असून यामुळे शिक्षकांच्या क्षमता वृद्धिगत होणार आहेत. देशातल्या सार्वजनिक आणि खाजगी शाळेतले 92 लाख शिक्षक याचे पालन करतील.

- खेळणी म्हणजे मनोरंजन आणि शिक्षण या दोन्हींची अभिव्यक्ती आहे. शालेय शिक्षणात सर्व स्तरावर खेळणी आधारित अनोखी स्वदेशी शिक्षण पद्धती विकसित केली जाईल.यामुळे वर्गातल्या नीरस आणि रटाळ शिक्षणाचे आनंददायी अनुभवात परिवर्तन होईल.

- डिजिटल सर्व प्रथम या मानसिकतेच्या संदर्भात नॅशनल डिजिटल एज्युकेशनल आर्किटेक्चर, एनडीईएआरची निर्मिती करण्यात येईल. ज्यामध्ये डिजिटल संरचना अध्यापन आणि अध्ययन यांना सहाय्य करण्याबरोबरच केंद्र, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या शैक्षणिक आखणी, प्रशासन आणि प्रशासकीय घडामोडीसाठीही मदत करणार आहे. डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विविधांगी शिक्षण परीरचना यामुळे प्राप्त होणार असून या आंतर कार्यान्वयन प्रणालीमुळे सर्व संबंधितांची विशेष करून राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांची स्वायत्तता सुनिश्चित होईल.

- कर्णबधीर मुलांसाठी देशभरात भारतीय संकेत भाषेच्या प्रमाणीकरणासाठी सरकार काम करणार असून या दिशेने राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम सामग्री विकसित करणार आहे.

- जेष्ठ आणि निवृत्त शिक्षक मोठ्या प्रमाणात असून शालेय शिक्षकांचे वैयक्तिक मेंटोर म्हणून ऑनलाईन/ ऑफलाईन सहाय्याद्वारे,विषय, संकल्पना यासाठी त्यांची मदत घेतली जाईल.

- आतापर्यंत विद्यार्थ्यांचे मुल्यांकन केवळ एक आयामी निकषाद्वारे केले जात होते. यामध्ये पूर्णतः परिवर्तन करत केवळ आकलनाचे

मुल्यांकन न करता विद्यार्थ्याच्या अनोखे कौशल्य आणि क्षमता जाणण्यासाठीची संधी या स्वरुपात मुल्यांकन केले जाईल.या अनुषंगाने समावेशक प्रगतीपुस्तक करण्याची संकल्पना असून यामध्ये विद्यार्थ्याची रुची, त्याची सामर्थ्य स्थळे, ज्या बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे त्या बाबी, यांचा उल्लेख राहील ज्यातून त्याला अनुकूल अशा अभ्यासक्रमाची निवड करणे शक्य होईल.

- संसाधन प्राप्तीत वाढ होण्यासाठी प्रौढ शिक्षणाचे गमक सामावून घेणारी ऑनलाईन मोड्यूल आणण्यात येणार आहेत.
- कोविड-19 महामारी असूनही या वर्षी 30 लाखाहून अधिक प्राथमिक शालेय शिक्षकांना डिजिटली प्रशिक्षित करण्यात आले.
- हा प्रशिक्षण कार्यक्रम असाच जारी राखत शाळा प्रमुख आणि शिक्षक यांच्या प्रगतीसाठीचा राष्ट्रीय उपक्रम निष्ठा मार्फत 2021-22 मध्ये 56 लाखाहून अधिक शालेय शिक्षकांचे प्रशिक्षण शक्य होणार आहे.
- गेल्या काही वर्षापासून, विद्यार्थ्यांच्या बोर्ड परीक्षांच्या आधी, त्यांचा ताण कमी करण्यात मदत करण्याच्या दृष्टीने आपले पंतप्रधान त्यांच्याशी संवाद साधतात. या दिशेने 2022- 23 या शैक्षणिक सत्रापासून सीबीएससी परीक्षा सुधारणा टप्याटप्याने सुरु करण्यात येणार आहेत. घोकंपट्टीला परीक्षेत थारा राहणार नाही तर संकल्पनेतली स्पष्टता, विश्लेषणात्मक कौशल्य आणि प्रत्यक्ष आयुष्यात त्या ज्ञानाचा उपयोग या कसोटीवर परीक्षा आधारित राहतील.
- विदेशी उच्च शिक्षण संस्थांसमवेत शैक्षणिक सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी, दुहेरी पदवी, सह पदवी, संलग्न व्यवस्था यासारख्या यंत्रणांना परवानगी देण्यासाठी नियामक यंत्रणा लागू करण्याचा प्रस्ताव आहे.

**परिशिष्ट VI**

| **अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधने (ईबीआर) (सरकारद्वारा संपूर्ण नियंत्रित रोखे, एनएसएसएफ कर्ज आणि इतर संसाधने)** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | *(कोटी रुपये)* |
| **भाग ए – सरकारद्वारा संपूर्ण नियंत्रित रोख्यांच्या माध्यमातून जमा करण्यात आलेली अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधने** | | | | | | | | |
| **मागणी क्रमांक** | **मंत्रालयाचे/ विभागाचे नाव आणि योजनेचे नाव** | **2016 -17** | **2017 -18** | **2018-19** | **2019 -20** | **2020-21** | **2020 -21** | **2021 -22** |
| | | **वास्तविक** | **वास्तविक** | **वास्तविक** | **वास्तविक** | **बीई** | **आरई** | **बीई** |
| 24 | **उच्च शिक्षण विभाग** | | | | | | | |
| | शिक्षण क्षेत्रात पायाभूत सुविधा आणि प्रणालीचे पुनरुज्जीवन (आरआयएसई) | --- | --- | --- | --- | 3000.00 | --- | |
| 44 | **आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय** | | | | | | | |
| | प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना | --- | --- | --- | --- | 3000.00 | --- | |
| 59 | **गृह निर्माण आणि नागरी कार्य मंत्रालय** | | | | | | | |
| | प्रधान मंत्री आवास योजना (पीएमएवाय) नागरी | --- | --- | 20000.00 | --- | 10000.00 | --- | |
| 61 | **जल संसाधन, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन** | | | | | | | |
| | ) पोलावरम सिंचन प्रकल्प | --- | --- | 1400.00 | 1850.00 | --- | 2234.29 | |
| | i) प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना (त्वरित सिंचन लाभ कार्यक्रम आणि इतर प्रकल्प) | 2187.00 | 3105.00 | 5493.40 | 1963.30 | 5000.00 | 4225.00 | NIL |
| 62 | **पेय जल आणि स्वच्छता** | | | | | | | |
| | स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), जल जीवन अभियान/ राष्ट्रीय ग्रामीण पेय जल कार्यक्रम | ---<br>--- | ---<br>--- | 8698.20<br>--- | 3600.00<br>--- | ----<br>12000.00 | ---<br>--- | |
| 70 | **नविकरणीय उर्जा मंत्रालय** | | | | | | | |
| | नविकरणीय उर्जा ग्रीड, ऑफ ग्रीड / वितरीत आणि विकेंद्रित नविकरणीय उर्जा | 1640.00 | --- | --- | --- | --- | --- | |
| | ) प्रधानमंत्री किसान उर्जा संरक्षण आणि उत्थान महाभियान (पीएम- कुसुम) | --- | --- | --- | --- | 1000.00 | --- | |
| 77 | **बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्रालय** | | | | | | | |
| | भारतीय आंतरदेशीय जलमार्ग प्राधिकरण (आयडब्ल्यूएआय) प्रकल्प | 340.00 | 660.00 | --- | ---- | --- | --- | |
| 78 | **उर्जा मंत्रालय** | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना/सौभाग्य | 5000.00 | 4000.00 | 13827.00 | 3782.00 | 5500.00 | 5000.00 | |
| | प्रणाली विकास निधी प्रकल्प | --- | | 5504.70 | --- | --- | --- | |
| 86 | **ग्रामीण विकास विभाग** | | | | | | | |
| | प्रधान मंत्री आवास योजना (पीएमएवाय) - ग्रामीण | --- | 7330.00 | 10678.80 | 10811.00 | 10000.00 | 20000.00 | |
| | ***एकूण*** | ***9167.00*** | ***15095.00*** | ***65602.10*** | ***22006.30*** | ***49500.00*** | ***31459.29*** | |

## *भाग बी-एनएसएसएफ कडून कर्जाद्वारा वित्तीय सहाय्य*

*(कोटी रुपये)*

| अनुक्र. | मंत्रालय/ विभागाचे नाव, योजनेचे नाव | 2016-17 वास्तविक | 2017-18 वास्तविक | 2018-19 वास्तविक | 2019-20 वास्तविक | 2020-21 बीई | 2020-21 आरई | 2021-22 बीई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग** | | | | | | | |
| | भारतीय खाद्य महामंडळ# | 70000.00 | 65000.00 | 7000.00 | 10000.00 | 36600.00 | 4636.00 | --- |
| 2 | **गृह निर्माण आणि नागरी कार्य** | | | | | | | |
| | इमारत साहित्य आणि तंत्रज्ञान प्रोत्साहन परिषद | --- | 8000.00 | --- | 5000.00 | --- | 0000.00 | |
| 3 | **खत विभाग** | | | | | | | |
| | धातू आणि खनिज व्यापार महामंडळ | --- | --- | --- | 1310.00 | --- | --- | --- |
| 4 | **इतर सार्वजनिक एजन्सीना सहाय्य (आवश्यकता भासल्यास अतिरिक्त संसाधनाची आवश्यकता भागवण्यासाठी, विशिष्ट योजना/ प्रकल्पा अंतर्गत)** | | | | | | | 30000.00 |
| | **एकूण** | **70000.00** | **73000.00** | **7000.00** | **26310.00** | **36600.00** | **4636.00** | **30000.00** |
| | ***गोळा बेरीज (ए+बी)*** | ***79167.00*** | ***88095.00*** | ***162602.10*** | ***48316.13*** | ***86100.00*** | ***126095.29*** | ***30000.00*** |

*# एफसीआयकडे 31.03.2020 रोजी एनएसएसएफची 2,54,600 कोटी रुपये कर्ज रक्कम देय आहे.*

***<u>टिप्पणी:</u>***

***(i)*** *नागरी हवाई वाहतूक मंत्रालया अंतर्गत एअर इंडिया असेट होल्डिंग लिमिटेड (एआयएएचएल) ला, संपूर्णतः सरकार नियंत्रित रोखे जारी करून 2019-20 या वित्तीय वर्षात 7000 कोटी रुपये इबीआर उभारण्यासाठी परवानगी देण्यात आली. ज्यायोगे एआयएएचएलकडे हस्तांतरित केलेले एयर इंडियाचे कर्ज पुनर्वित्तपोषित करता येईल.*

***(ii)*** *रेल्वे मंत्रालयाला, राष्ट्रीय प्रकल्पांच्या वित्तीय पाठबळासाठी 10,200 कोटी (5,200 कोटी वित्तीय वर्ष 2018-19 आणि ` 5,000 कोटी वित्तीय वर्ष 2019-20) रुपयापर्यंतच्या निधीची आवश्यकता भागवण्यासाठी, कर्जाची परवानगी. चुकते करण्याचे दायित्व सरकारी तिजोरी निभावत आहेत आहे.*

***(iii)*** ***<u>सार्वजनिक बँकांमध्ये भांडवल घालणे :</u>*** *सरकारी बँकांमध्ये 2017-18 मध्ये 80,000 कोटी, 2018-19 मध्ये 1,06,000 कोटी आणि 2019-20 मध्ये 65,443 कोटी रुपये पुनर्भांडवलीकरणासाठी घालण्यात आले. यासाठी 2020-21 या वित्तीय वर्षात सरकारकडून व्याज रहित विशेष सिक्युरिटीजच्या माध्यमातून नवे भांडवल म्हणून 5,500 कोटी रुपये घालण्यात आले. केंद्र सरकारने रोखे जारी करत तीन इतर बँकांमध्ये आयडीबीआय (4,557 crore), एक्झिम बँक (5,050 crore) आणि आयआयएफसीएल (5,297.60 crore) भांडवल घातले.*

*(iv)* *एन्युटी प्रकल्पावरच्या दायीत्वाचे विवरण प्राप्ती बजेट 2021-22 च्या भाग बी मध्ये देण्यात आले आहे. वित्तीय वर्ष 2019-20 च्या अखेरीला चुकती न केलेली वार्षिक दायित्व रक्कम 41,822.04 कोटी आहे.*

## प्रत्यक्ष कर प्रस्ताव परिशिष्ट:

| अनु क्र. | प्रस्ताव | थोडक्यात प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|
| 1. | **ज्येष्ठ नागरिकांना दिलासा** | 75 वर्ष आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या ज्येष्ठ निवृत्तीवेतन धारकांना अनुपालनाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी त्यांना आय कर विवरणपत्र दाखल करण्यातून वगळण्याचा प्रस्ताव आहे, मात्र देय कर, संबंधित बँकेने कापणे आवश्यक आहे. निवृत्तीवेतना व्यतिरिक्त केवळ व्याजाचे उत्पन्न असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना ही सवलत देण्याचा प्रस्ताव आहे. |
| 2. | **काल मर्यादेत घट** | अनुपालनाचे ओझे कमी करण्यासाठी, मुल्यांकन पुन्हा उघडण्यासाठीची मुदत, संबंधित मुल्यांकन वर्ष समाप्तीपासून सध्याच्या सहा वर्षावरून कमी करून तीन वर्षे करण्यात येत आहे. एका वर्षात 50 लाख किंवा त्यापेक्षा जास्त अघोषित उत्पन्न असल्याचा पुरावा असल्यास 10 वर्षापर्यंत पुन्हा उघडण्यासाठीच्या परवानगीचा प्रस्ताव आहे. मुल्यांकन पुन्हा उघडण्यासाठी विवेकाधिकार पूर्णतः हटवण्याचा प्रस्ताव असून डाटा विश्लेषणातून, नियंत्रक आणि महा लेखा परीक्षक यांनी हरकत घेतलेली आणि यंत्रणेने दर्शवलेली प्रकरणेच पुन्हा उघडता येतील.<br><br>याशिवाय आय कर प्रक्रियेत निश्चितता आणण्यासाठी मुल्यांकन आणि कर विवरणपत्र प्रक्रियेसाठी काल मर्यादा तीन महिन्यांनी कमी करण्याचा प्रस्ताव आहे. |

| | | |
|---|---|---|
| 3. | **लाभांशासाठी दिलासा** | करदात्यांना दिलासा देण्यासाठी, लाभांश जाहीर/दिला गेल्यावरच अग्रिम कर देयता उत्पन्न होईल. स्थावर मालमत्ता पायाभूत ट्रस्ट किंवा पायाभूत गुंतवणूक ट्रस्ट यांना दिलेला लाभांश, उद्गम करातून मुक्त राहील. विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणुकदारांच्या लाभांश उत्पन्नासह उत्पन्नावरचा कर हा कराराच्या दरानुसार कापण्याचा प्रस्ताव आहे. परदेशी कंपनीसाठी लागू असलेला कर दर हा किमान वैकल्पिक कर दरापेक्षा कमी असल्यास,लाभांश रक्कमेला किमान वैकल्पिक करातून वगळण्याचा प्रस्ताव आहे. |
| 4. | **विवाद तोडगा समिती (डीआरसी) स्थापन करणे** | दावे कमी करण्यासाठी आणि छोट्या करदात्यांसाठी विवादावर तोडगा काढण्याला गती देण्यासाठी विवाद तोडगा समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. 50 लाखापर्यंत करपात्र आणि विवादास्पद उत्पन्न 10 लाखापर्यंत असलेला करदाता समितीकडे दाद मागण्यासाठी पात्र आहे. कार्यक्षमता,पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी समितीची प्रक्रिया फेसलेस अर्थात चेहरा विरहीत पद्धतीने राबवली जाईल. परिणामी 01.02.2021 पासून तोडगा काढण्यासाठीचा लवाद बंद करण्यात येईल.तथापि अर्जदाराने अंतरिम मंडळाचा पर्याय स्वीकारल्यास प्रलंबित प्रकरणाबाबत अंतरिम मंडळ निर्णय घेईल. |
| 5. | **चेहराविरहीत प्राप्ती कर अपिलेट न्यायाधिकरण** | कर अपिलाबाबत पारदर्शी यंत्रणा पुरवण्यासाठी प्राप्ती कर अपिलेट न्यायाधिकरण, फेसलेस करण्याचा आणि अधिकारक्षेत्र विरहीत करण्याचा प्रस्ताव आहे. राष्ट्रीय फेसलेस प्राप्ती कर अपिलेट न्यायाधिकरण केंद्र उभारण्यात येईल आणि अपील कर्ता आणि न्यायाधिकरण |

| | | |
|---|---|---|
| | | यांच्यातला पत्र व्यवहार इलेक्ट्रोनिकली करण्यात येईल. व्यक्तिगत सुनावणीची आवश्यकता असेल तेव्हा ही सुनावणी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतली जाईल. |
| 6. | **नागरी सहकारी बँकांचे (युसीबी) लघु वित्त बँकांत (एसएफबी) रुपांतर करताना कर न्युट्रॅलिटी** | युसीबीचे एसएफबीमध्ये रुपांतर करणे सुलभ व्हावे यासाठी कर न्युट्रॅलिटी अर्थात तटस्थता पुरवण्याचा प्रस्ताव आहे. एसएफबीला हस्तांतरित करण्यात आलेल्या मालमत्तेवर युसीबीला भांडवली लाभावरचा कर देण्याची आवश्यकता राहणार नाही. |
| 7. | **किफायतशीर दरातली घरे आणि परवडणाऱ्या भाडे दरातल्या गृहनिर्मिती प्रकल्पांना प्रोत्साहन** | किफायतशीर दरातल्या घर खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी, किफायतशीर दरातल्या घर खरेदीसाठी घेतलेल्या कर्जावरच्या व्याजासाठी 1.5 लाख रुपयांच्या अतिरिक्त वजावटीचा दावा करण्यासाठीचा पात्रता काळ 31 मार्च 2022 पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. किफायतशीर घरांचा पुरवठा वाढावा याकरिता या घरांच्या प्रकल्पासाठी टॅक्स हॉलीडे अर्थात करविषयक सवलतीसाठी दावा करण्यासाठीच्या पात्रता काळात एक वर्षाने वाढ करत 31 मार्च 2022 करण्याचा प्रस्ताव आहे.<br><br>स्थलांतरित मजुरांसाठी किफायतशीर भाडे दरातल्या गृह निर्मिती पुरवठ्याला प्रोत्साहन देण्यासाठी, अधिसूचित किफायतशीर भाडे दरातल्या घरबांधणी प्रकल्पांना नवी कर सूट देण्याचा प्रस्ताव आहे. |
| 8. | **स्टार्ट अप्स साठी कर लाभ** | देशात अधिक स्टार्ट अप उभारण्यासाठी चालना देण्याकरिता, स्टार्ट अप्ससाठी टॅक्स हॉलीडे अर्थात करविषयक सवलतीसाठी दावा करण्यासाठीच्या पात्रता काळात एक वर्षाने वाढ करत 31 मार्च 2022 करण्याचा प्रस्ताव आहे.<br>स्टार्ट अप्स मध्ये गुंतवणुकीला चालना |

| | | |
|---|---|---|
| | | देण्यासाठी, स्टार्ट अप अधे केलेल्या गुंतवणुकीसाठी भांडवली लाभ सूट यासाठी दावा करण्याच्या पात्रता काळात एका वर्षाने वाढ करत 31 मार्च 2022 करण्याचाही प्रस्ताव आहे. |
| 9. | **अनिवासी भारतीयांना सेवानिवृत्ती लाभ खात्यातील उत्पनावर सवलत** | करप्रणालीत असलेल्या वेगवेगळ्या तरतुदींमुळे अनिवासी भारतीयांना त्यांच्या परदेशी निवृत्तीवेतन लाभ खात्यातील उत्पन्नाबाबत होणाऱ्या त्रासातून त्यांची मुक्तता करण्यासाठी, परदेशी सेवानिवृत्ती लाभ खात्यावरच्या उत्पन्नाबाबतची करप्रणाली एकसमान करण्याचे नियम अधिसूचित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. |
| 10. | **लेखापरीक्षणातून सवलत** | डिजिटल व्यवहारांवर सवलत देण्यासाठी आणि ज्या व्यक्ती सर्व व्यवहार डिजिटली करत आहेत, त्यांच्यावरचा करविवरण भरण्याचे ओझे कमी करण्यासाठी, ज्या व्यक्ती आपले 95 टक्के व्यवहार डिजिटली करत आहेत, अशा व्यक्तींसाठी लेखापरीक्षणाची मर्यादा 5 कोटी वार्षिक उत्पन्नावरुन 10 कोटी रुपयांपर्यंत करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. |
| 11. | **निर्गुंतवणूकीमुळे होणारे नुकसान पुढच्या व्यवहारात कायम ठेवण्याच्या अटीत शिथिलता** | सार्वजनिक कंपन्यांमध्ये धोरणात्मक गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी, अशा पीएसयुच्या विलीनीकरणात निर्गुंतवणूकीसोबत नुकसानाची रक्कम पुढे नेण्याची अट वगळण्याचा निर्णय घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. |
| 12. | **निर्गुंतवणुकीसाठी करविरहित कंपनी विलगीकरण (डीमर्जर) विषयक अटीत शिथिलता** | धोरणात्मक गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक कंपन्यांकडून खरेदीदार कंपन्यांना मालमत्तांचे हस्तांतरण मानीव करण्याचा प्रस्ताव असून जेणेकरून हा व्यवहार करविरहित अलगीकरण म्हणून समजला जाईल |
| 13. | **पायाभूत कर्जनिधी** | पायाभूत सुविधांद्वारे निधी उभा करण्यास |

| | | |
|---|---|---|
| | **(IDF) द्वारे झिरो कूपन बॉण्ड्स** | परवानगी देण्यासाठी, नोंदणीकृत IDF कडून जारी झिरो कूपन बॉण्ड्स करसवलतीस पात्र करण्याचा प्रस्ताव |
| 14. | **युनिट लिंक्ड इन्श्युरन्स प्लान (युलिप) साठी करप्रणाली तर्कसंगत करणे** | युलिपवरच्या कराला तर्कसंगत करण्यासाठी, विम्याचा वार्षिक हप्ता 2.5 लाख असेपर्यंतच्या विम्याची मुदत संपल्यानंतरच्या प्रक्रियेत करात सवलत देण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, विमाधारकाच्या मृत्यूनंतर मिळणाऱ्या रकमेवर असलेली कर सवलत तशीच सुरु राहणार असून त्यात हप्त्याच्या रकमेची मर्यादा असणार नाही. तसेच, युलिपच्या वार्षिक अडीच लाख हप्त्याची मर्यादा, केब्वळ 1 फेब्रुवारी 2021 नंतर काढलेल्या विम्यालाच लागू असेल. त्यापुढे यात समानता आणण्यासाठी, सवलत नसलेल्या युलिप विम्यांना भांडवली मिळकतीवर, म्युच्युअल फंड्सवर असलेल्या कर सवलती लागू असतील. |
| 15. | **भविष्यनिर्वाह निधीवरील करमुक्त उत्पन्न तर्कसंगत करणे** | उच्च उत्पन्न असलेल्या कर्मचाऱ्यांच्या उत्पन्नावरील करसवलत अधिक तर्कसंगत करण्यासाठी, विविध भविष्य निर्वाह निधीमध्ये कर्मचाऱ्यांच्या वार्षिक अडीच लाखांपर्यंतच्या योगदानावरील व्याजावर मिळणाऱ्या करसवलतीवर मर्यादा आणण्याचा प्रसाव मांडण्यात आला आहे. 01.04.2021 नंतर दिलेल्या योगदानावरच ही मर्यादा लागू असेल. |
| 16. | **भागीदारांना मिळालेल्या अधिकच्या उत्पन्नावरील करपात्रता** | करपात्रतेत निश्चितता यावी, यासाठी भागीदारीत सुरु असलेल्या कंपन्यांमध्ये टाकलेल्या भांडवलाच्या तुलनेत भागीदाराला अधिक मालमत्ता वा उत्पन्न मिळाले असल्यास त्याच्या करपात्रतेशी संबंधित तरतुदी अधिक तर्कसंगत करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. |

| | | |
|---|---|---|
| 17. | **सद्भावमूल्य घसरणीविषयीचे स्पष्टीकरण** | सुनिश्चितता आणण्यासाठी,असे स्पष्ट करण्याचा प्रस्ताव आहे की सद्भावमूल्यात कोणतीही घसरण करण्यास मान्यता दिली जाणार नाही. मात्र, सद्भाव प्राप्तीसाठी जी रक्कम दिली गेली असेल, ती रक्कम संदर्भात विक्री करतांना कापून घेण्यास मंजुरी दिली जाईल. |
| 18. | **विक्रीत घसाऱ्याबाबतचे स्पष्टीकरण** | सुनिश्चितता आणण्यासाठी, विक्रीत घसाऱ्यामध्ये सर्व प्रकारच्या हस्तांतरणाचा समावेश केला जाईल. |
| 19. | **बनावट बिले/खोटे व्यवहार** | महसुलाचे संरक्षण करण्यासाठी, 2 कोटी रुपयांच्या वरील व्यवहारांमध्ये बनावट बिले/खोटे व्यवहार केल्याचे आढळल्यास, त्याविरुद्धच्या दंडाच्या कारवाईत मालमत्तेवर जप्ती आणण्याची तरतूद ठेवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. |
| 20. | **छोट्या विश्वस्त संस्थांना दिलासा** | शैक्षणिक संस्था आणि रुग्णालये चालवणाऱ्या छोट्या धर्मादाय विश्वस्त संस्थांवरील कराचा बोजा कमी करण्याच्या उद्देशाने,अशा संस्थांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा अधिक शिथिल करत ती 1 कोटी रुपयांवरुन 5 कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. |
| 21 | **धर्मदाय संस्थांचा तोटा पुढे घेऊन जाण्याबाबत** | सुनिश्चितता आणण्यासाठी,धर्मादाय संस्थांना आपला तोटा पुढच्या आर्थिक वर्षाच्या ताळेबंदात दाखवता येणार नाही, मात्र, कर्जाची परतफेड करण्याची किंवा आपल्या निधीची भरपाई करण्याची अनुमती असेल. |
| 22. | **समानतेविषयक आकारबाबत (एक्विलायझेशन लेव्ही) स्पष्टीकरण** | सुनिश्चितता आणण्यासाठी असे स्पष्ट करण्यात आले आहे की प्राप्तीकराअंतर्गत करपात्र असलेल्या व्यवहारांना समानतेविषयक आकार (एक्विलायझेशन लेव्ही) लागू असणार नाही. त्याशिवाय, एक्विलायझेशन लेव्ही वस्तू आणि सेवांच्या |

| | | |
|---|---|---|
| | | प्रत्यक्ष/ऑफलाईन पुरवठ्याबाबत लागू असेल असे स्पष्ट करण्यात आले आहे. |
| 23 | **कामगार कल्याण निधी आमध्ये निश्चित तारखेला कर्मचाऱ्यांचे वेळेत योगदान जमा होणे** | कंपन्यांच्या विविध कल्याण निधींमध्ये कर्मचाऱ्यांनी आपले योगदान निश्चित वेळेत न जमा केल्यास, त्यामुळे त्यांना व्याजदरावर/उत्पन्नावर कायमचे नुकसान सहन करावे लागते. कर्मचाऱ्यांकडून निश्चित वेळेत निधीत योगदान दिले जाणे सुनिश्चित करण्यासाठी,कंपनीने कर्मचाऱ्यांच्या योगदानापोटी जमा करायची रक्कम उशिरा जमा केल्यास, कंपनीला ती रक्कम कापण्याची परवानगी कधीही नसेल. |
| 24 | **सार्वभौम संपत्ती निधी आणि पेन्शन फंड (SWF/PF) वर मिळणाऱ्या सवलतीबाबतच्या अटींमध्ये शिथिलता** | भारतातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये अधिकाधिक SWF/PF द्वारे गुंतवणूक वाढवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी काही अटींमध्ये शिथिलता देण्याचा प्रस्ताव असून,त्यामुळे गेल्या अर्थसंकल्पात प्रस्तावित 100 टक्के करसवलत मिळू शकेल. ज्या अटींमध्ये शिथिलता आणण्याचे प्रस्तावित आहे, त्या अटी म्हणजे, कर्ज वा उधारीवर निर्बंध,व्यावसायिक कामांवरील बंधने,पायाभूत मालकी असलेल्या कंपन्यांमध्ये थेट गुंतवणूक इत्यादी... |
| 25. | **आयएफएससी वरील करसवलत** | आयएफएससीला प्रोत्साहन देण्यासाठी,करात आणखी काही सवलती देण्याचा प्रस्ताव आहे. ज्यात विमाने भाड्याने देणाऱ्या कंपनीच्या भांडवली मिळकतीवर टैक्स हॉलिडे, विमाने भाडेपट्टीवर देणाऱ्या परदेशी कंपनीला दिलेल्या भाड्यावरील करात सवलत, आयएफएससी मधील परदेशी निधी दुसरीकडे ठेवणे आणि आयएफएससी मध्ये असलेल्या परदेशी बँकांच्या आंशिक गुंतवणुकीवर करसवलत देण्याचा प्रस्ताव आहे. |
| 26 | **कर कापला गेलेल्या/जमा** | ज्या व्यक्तीच्या उत्पन्नावरील कराची मोठी |

| | | |
|---|---|---|
| | **केलेल्या व्यक्तीकडून विवरणपत्र न भरले जाणे** | रक्कम कापली गेली आहे/जमा केली गेली आहे,अशा व्यक्तीने विवरणपत्र न भरण्याची पद्धत सुरु राहू नये यासाठी,ज्या व्यक्तीचा गेल्या दोन वर्षांपासूनचा TDS/TCS 50,000 पेक्षा अधिक आहे,आणि ज्यांनी प्राप्तीकरावरील विवरणपत्रे भरलेले नाही, त्यांच्या TDS/TCS चा दर दुप्पट किंवा 5 % या निश्चित दरापैकी जे अधिक असेल, त्यानुसार आकाराला जाईल. जिथे कराची पूर्ण रक्कम कापली जाणे अपेक्षित असे, जसे की वेतनावरील उत्पन्न, अनिवासीना पेमेंट, लॉटरी इत्यादीवर ही सुविधा उपलब्ध असणार नाही. |
| 27 | **वस्तूंच्या खरेदीवर TDS शुल्क लावणे** | TDS ची व्याप्ती वाढवण्यासाठी, एका वर्षात 50 लाख पेक्षा जास्त रुपयांपेक्षा अधिकच्या खरेदीवर 0.1 % TDS आकारण्याचा प्रस्ताव आहे. कर अनुपालनाचे ओझे कमी करण्यासाठी, कर कपातीची जबाबदारी केवळ 10 कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या व्यक्तीवरच टाकण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे. |
| 28 | **अग्रीम विनियोगविषयक प्राधिकरणाच्या जागी अग्रीम विनियोग मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव** | प्रकरणांचा त्वरित निपटारा सुनिश्चित करण्यासाठी अग्रीम विनियोगविषयक प्राधिकरणाच्या जागी अग्रीम विनियोग मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्याशिवाय या बोर्डाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात अपील करण्याची सुविधाही देण्यात आली आहे. |
| 29. | **अग्रीम मूल्य करार (APA) आणि दुय्यम समायोजनासाठी किमान पर्यायी कर (MAT) अनुरूप करणे** | ज्या करदात्यांना, अग्रीम मूल्य करार किंवा दुय्यम समायोजनापोटी, पैसे परत पाठवल्यामुळे किमान पर्यायी कर (MAT) देयता आहे,त्यांना दिलासा देण्यासाठी, या उत्पन्नावरील करपात्रता MAT च्या सुविधांशी अनुरूप करण्याचा प्रस्ताव आहे. |
| 30. | **अवकाश प्रवास सवलत-** | कर्मचाऱ्यांना दिलासा देण्यासाठी, |

| | | |
|---|---|---|
| | **एलटीसीसाठी रोख रक्कम योजनेत सवलत** | एलटीसीच्या ऐवजी यंदा कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या रोख रकमेवर करसवलत देण्याचा प्रस्ताव आहे. |
| 31 | **निवासी घरांच्या प्राथमिक विक्रीवर सुरक्षित हार्बर मर्यादेत वाढ** | घर खरेदी करणाऱ्या आणि बांधकाम विकासकाना प्रोत्साहन देण्यासाठी, निवासी घरांच्या विशिष्ट प्राथमिक विक्रीवर असलेली सुरक्षित हार्बर मर्यादा 10 टक्क्यांवरुन 20 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. |
| 32 | **संकीर्ण** | • विवरणपत्रे भरण्याच्या प्रक्रीयेशी सबंधित तरतुदींमध्ये परिस्थितीनुरूप दुरुस्त्या करण्याचा प्रस्ताव असून त्यानुसार, काही कपात करण्यास मंजुरी देणे आणि लेखा परीक्षणात नोंदल्या गेलेल्या उत्पन्नाचे समायोजन करण्यासाठी स्पष्टीकरण देण्याचा प्रस्ताव .<br><br>• निश्चित प्राधिकरणाद्वारे विवरणपत्र मागवण्यासाठी नोटीस जारी करण्याचा प्रस्ताव देखील मांडण्यात आला आहे.<br><br>• विशिष्ट श्रेणीतील करदात्यांच्या चुकीच्या विवरणपत्रांबाबतच्या नियमात शिथिलता देण्यासाठी आणि काही विशिष्ट करदात्यांसाठी विवरणपत्र भरण्याच्या तारखेला अनुरूप करण्यासाठीचे जादा अधिकार बोर्डाला देण्याचा प्रस्ताव आहे.<br><br>• व्यावसायिकांसाठीच्या अनुमानित करावर (प्रीज्मटिव्ह टैक्स) |

| | | |
|---|---|---|
| | | मर्यादित देयता भागीदारी लागू असणार नाही, हे स्पष्ट करण्याचाही प्रस्ताव आहे.<br>• सुनिश्चितता आणण्यासाठी 'कर देयता' संज्ञेची निश्चित व्याख्या करण्याचा प्रस्ताव आहे. |

## अर्थसंकल्पावरील भाषणाचे परिशिष्ट

### A. सीमाशुल्क आणि केंद्रीय अबकारी करातील वैधानिक बदल:

### 1. सीमाशुल्क कायदा, 1962 मधील महत्वाच्या दुरुस्त्या :

| अनुक्रम | दुरुस्त्या/सुधारणा |
|---|---|
| **A.** | **ड्वेल टाईम कमी करणे आणि ईओडीबी (EoDB) (व्यापार सुविधा)** |
| 1. | माल पोहोचण्याच्या दिवसापूर्वीचा दिवस संपण्याचा आधी बिल ऑफ एन्ट्री भरणे अनिवार्य करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. (कलम 46) |
| 2. | आयातदार/ निर्यातदारांकडून स्वयंसुधारणांच्या आधारावर काही दुरुस्त्या करण्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव आहे. आतापर्यंत अशा सर्व सर्व दुरुस्त्यांसाठी संबंधित अधिकाऱ्यांची परवानगी अनिवार्य असे ( कलम 149) |
| 3. | कागदविरहित कार्यवाहीला प्रोत्साहन देण्यासाठी नोटीस, आदेश जारी करण्यासाठी सामाईक पोर्टलचा वापर केला जावा, आणि व्यापाऱ्यांना सीमाशुल्क विभागाशी चर्चा करण्यासाठी अशा पोर्टलचा, वन पोइंत डिजिटल इंटरफेस म्हणून वापर केला जाण्याचा प्रस्ताव आहे. |
| **B.** | **कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व** |
| 1 | या कायद्यात आणखी एक नवी तरतूद जोडण्याचा प्रस्ताव आहे, ज्यानुसार, सीमा शुल्क अधिनियमाअंतर्गत सुनिश्चित अथवा विनिर्दिष्ट केले नसल्यास, किंवा त्यांच्यात बदल केले नसल्यास, ते निरस्त केलेले नसल्यास, अशा सशर्त सवलती, त्या सवलती लागू केल्यापासून दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या 31 मार्च रोजी समाप्त होतील. (सीमाशुल्क अधिनियम कलम 25) |
| 2. | आणखी एक कलम, 28 BB समाविष्ट करण्याचा प्रस्ताव आहे, याचा उद्देश तपास कार्ये पूर्ण करण्यासाठी काही सवलतींसह दोन वर्षांचा कालावधी निश्चित करणे हा आहे. |
| **C.** | **कर अनुपालनात सुधारणा** |
| 1. | एक नवी तरतूद जोडण्याचा प्रस्ताव असून, ज्यानुसारकरा, रेमिशन अथवा परताव्याचा चुकीचा दावा करून मालाची निर्यात केली गेल्यास तो माल जप्त करण्याची तरतूद असावी. (सीमा शुल्क अधिनियम कलम 113 अंतर्गत एक पोटकलम जोडले जात |

| | |
|---|---|
| | आहे) |
| 2. | सीमा शुल्क अधिनियमात (कलम 114AC) एक नवी तरतूद जोडण्याचा प्रस्ताव आहे, ज्यानुसार, अशा काही विशिष्ट प्रकरणांमध्ये-जिथे कोणी बनावट बिले दाखवून मालाची निर्यातीवरील करपरताव्यांचा दावा केल्यास, त्यांच्यावर दंड आकारला जाऊ शकेल. |
| **E.** | **जप्त सोन्याचा निपटारा** |
| 1. | सीमाशुल्क अधिनियमाच्या कलम 110 मध्ये प्रस्तावित सुधारणेनुसार, जप्त केलेल्या सोन्याच्या पूर्व परीक्षा प्रक्रियेत सुधरणा करण्याची तरतूद आणि जेणेकरून अशा जप्त सोन्याचा निपटारा त्वरित होऊ शकेल. |

**2. सीमाशुल्क जकात कायदा 1975 मध्ये सुधारणा:**

| **अनुक्रम** | **सुधारणा/दुरुस्त्या** |
|---|---|
| **A** | **सीमाशुल्क जकात कायदा, 1975 च्या पहिल्या अनुसूची मध्ये सुधारणा** |
| 1. | सीमाशुल्क जकात कायद्याच्या पहिल्या अधिसूचिमध्ये HSN2022 च्या अनुषंगाने सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. हे बदल 01.01.2022 पासून लागू होतील. त्याशिवाय काही नव्या जकात लाईन्स देखील तयार केल्या जात आहेत. |
| B | **अँटी डम्पिंग शुल्क, (ADD), काउंटरवेलिंग शुल्क CVDआणि सुरक्षाविषयक उपाययोजनांमध्ये दुरुस्त्या करण्याचा प्रस्ताव आहे.** |

| | |
|---|---|
| 1. | अँटी डम्पिंग शुल्क,(ADD), काउंटरवेलिंग शुल्क CVD आणि सुरक्षाविषयक उपाययोजनांशी संबंधित तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे (सीमाशुल्क जकात अधिनियम आणि संबंधित नियम) ज्यानुसार पुढील सुविधा दिल्या जातील :<br>**(i)** खंडणीविरोधी तपास सुरु झाल्याच्या तारखेपासून शुल्क लागू करण्यासाठी;<br>**(ii)** शोषण विरोधी तरतुदी;<br>**(iii)** हे शुल्क एकदा पाच वर्षांसाठी लागू केले जाईल,त्यानंतर त्याचा आढावा घेतला जाईल;<br>**(iv)** EoU आणि SEZs द्वारे मालाच्या उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या आणि देशांतर्गत भाडेक्षेत्रात स्वच्छ/नष्ट केल्या जाणाऱ्या (ज्यावर ADD किंवा CVD आकारले जाऊ शकेल) अशा इनपुट्स वर ADD /CVD लावण्यासाठी एक समान तरतूद;<br>**(v)** जेव्हाही कुठे कुठले विशेष ADD किंवा CVD शुल्क तात्पुरते मागे घेतले जाते, तेव्हा ही तात्पुरती सवलत एकावेळी एक वर्षापेक्षा अधिक काळासाठी लागू असणार नाही;<br>**(vi)** संबधित तपास अधिकाऱ्यांकडे समीक्षाधीन असलेले ADD शुल्क कालावधी संपण्याच्या किमान तीन महिने आधी या तपासकामांचे निष्कर्ष संबंधित अधिकाऱ्यांकडून मांडले जावेत,( ही तरतूद 1 जुलै 2021 पासून लागू होणार);<br>अनुक्रम (vi) दुरुस्तीसंबंधित नियमांमध्ये केली जाणार असून इतर सर्व दुरुस्त्या सीमाशुल्क जकात कायद्यात केल्या जाणार आहेत. |
| 2. | सुरक्षा विषयक उपाययोजनांमध्ये दुरुस्त्या प्रस्तावित असून त्यानुसार, मोठ्या प्रमाणात वस्तूंची आयात केल्यामुळे देशांतर्गत उद्योगांना फटका बसू नये यासाठी तपास करण्याची प्रक्रिया सुरु केली जाऊ शकेल आणि सेफगार्ड TRQs लागू केले जाऊ शकतील. |

3. **केंद्रीय अबकारी कायदा 1944 मध्ये दुरुस्त्या/सुधारणा :**

| | |
|---|---|
| 1. | ● जागतिक सीमाशुल्क संघटनेद्वारे लागू करण्यात आलेल्या नामकरणाच्या सुरळीत व्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतर त्या अनुषंगाने नव्या टैरीफ लाईन्स जोडण्यात येत आहेत.<br><br>● स्पष्टीकरणाशी संबंधित अनुसूचिमध्ये काही किरकोळ बदल केले जात आहेत. |

**4. सीमाशुल्क अधिनियमांमध्ये सुधारणा:**

सीमाशुल्क अधिनियम 2017 (IGCR) (सवलतीच्या शुल्कदरात मालाची आयात) केली जात असून जेणेकरुन खालील व्यापार सुविधाविषयक उपाययोजना करता येतील:

- ICGR अंतर्गत आयात करण्यात आलेल्या वस्तूंवर (मौल्यवान धातू सोडून) जॉब वर्क
- ICGR अंतर्गत आयात करण्यात आलेल्या भांडवली वस्तूंवर कमी मूल्यानुसार सीमाशुल्क अदा केल्यानंतर त्यांना क्लियरन्स देणे

.

**B. सीमाशुल्क दरात सुधारणा**

**1. शेतकरी,एमएसएमई क्षेत्र आणि इतर देशांतर्गत उत्पादकांना लाभ मिळण्यासाठी समान संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मूलभूत सीमाशुल्क दरात परिवर्तन करण्यात आले आहे. (02.02.2021 पासून लागू):**

| अनु क्र. | विभाग | विशिष्ट माल/वस्तू | शुल्क दर | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | ते |
| 1. | **कृषी** | कापूस | 0 | 5%* |
| | | कापूस अवशेष | Nil | 10% |
| | | कच्चे रेशीम (न फेकलेले) आणि रेशमी कापड, रेशीम अवशेषांपासून तयार केलेलं कापड | 10% | 15% |
| | | अबकारी कर लागू असलेल्या वस्तूंसाठी लागणारे डीनेचर्ड इथैल अल्कोहोल (इथेनॉल) | 2.5% | 5% |
| | | कोलंबी माशांसाठीचे खाद्य | 5% | 15% |
| | | माशांसाठी गोळ्यांच्या स्वरूपातील खाद्य | 5% | 15% |
| | | मासे, क्रस्तेशियन, मोलास्क आणि इतर जलचरांसाठी कणिक,खाद्य आणि गोळ्या | 5% | 15% |
| | | मका ब्रान | Nil | 15% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | डीऑईल्ड राईस ब्रान केक | Nil | 15% |
| 2. | **रसायने** | कार्बन ब्लैक | 5% | 7.5% |
| | | बिस-फिनाईल ए | Nil | 7.5% |
| | | एपिक्लोरोहायड्रीन | 2.5% | 7.5% |
| 3. | **प्लास्टिक** | बांधकाम व्यावसायिकांसाठीचे प्लास्टिक वेअर्स, ज्यांचा इतर कुठे उल्लेख केला गेलेला नाही | 10% | 15% |
| | | पॉलीकार्बोनेट्स | 5% | 7.5% |
| 4. | **चामड्याच्या वस्तू** | वेट ब्लू क्रोम तेंड चामडे, क्रस्ट लेदर, सर्व प्रकारच्या पूर्ण तयार चामड्याच्या वस्तू, ज्यात त्यांचे स्प्लिटस आणि स्लाईड्स पण समाविष्ट असतील. | Nil | 10% |
| 5. | **रत्ने आणि जवाहिरे** | पैलू पडलेले आणि पोलिश केलेले घन झिर्कोनिया | 7.5% | 15% |
| | | सिंथेटिक (नकली) पैलू पाडलेली आणि पोलिश केलेली रत्ने | 7.5% | 15% |
| 6. | **भांडवली वस्तू आणि यंत्रे** | टनल बोरिंग मशीन्स | Nil | 7.5% |
| | | टनल बोरिंग मशीन्स उत्पादनाचे सुटे भाग आणि इतर घटक | Nil | 2.5% |
| 7. | **वाहन क्षेत्र** | विशिष्ट वाहनाचे सुटे भाग, इग्निशन वायरिंग सेट्स, सेफ्टी ग्लास, सिग्नलिंग उपकरणांचे सुटे भाग इत्यादी | 7.5%/ 10% | 15% |
| 8. | **धातूच्या वस्तू** | स्क्रू, नट्स इत्यादी | 10% | 15% |

**त्याशिवाय, 5 % कृषी पायाभूत आणि विकास उपकर देखील लागू*

**2. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात मूल्यवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी सीमाशुल्क दारात बदल करण्यात आले आहेत. ( हे नवे दर, इतर कुठे त्यांचा उल्लेख झाला नसल्यास, 2.2.2021 पासून लागू होतील.)**

| अनुक्रम | वर्णन | पासून | ते |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | मोबाईल फोन्सच्या उत्पादनासाठी लागणारे इनपुटस, पार्टस आणि उप पार्टस, यात :<br>(1) प्रिंटेड सर्किट बोर्ड असेंब्ली (PCBA)<br>(2) कॅमेरा मोड्यूल<br>(3) कनेक्टर<br>[01.04.2021 पासून लागू] | 0<br>0<br>0 | 2.5%<br>2.5%<br>2.5% |
| 2. | प्रिंटेड सर्किट बोर्ड असेंब्ली (PCBA), मोड्यूल्ड प्लास्टिक चार्जर आणि अडाप्तर उत्पादनासाठी | 10% | 15% |
| 3. | मोबाईल चार्जर चे इनपुटस, पार्टस (PCBA,शिवाय) | Nil | 10% |
| 4. | इनपुटस, पार्टस आणि उप पार्टस (PCBA,शिवाय) लिथियम आयन बॅटरी आणि बॅटरी पैक साठी | 0 | 2.5% |
| 5. | रेफ्रीजेटर आणि एसीसाठीचे कॉम्प्रेसर | 12.5% | 15% |
| 6. | विशिष्ट इन्सुलेटेड वायर्स आणि केबल्स | 7.5% | 10% |
| 7. | ट्रान्सफॉर्मर चे विशिष्ट भाग, जसे बॉबीन, ब्राईकेट, वायर्स इत्यादी | Nil | Applicable Rate |
| 8. | एलईडी लाईट्स चे इनपुट्स आणि भाग किंवा फिक्सर-एलइडी लैम्प्स सह | 5% | 10% |
| 9. | सोलर इन्व्हर्टर | 5% | 20% |
| 10. | सोलर कंदील किंवा सौर दिवे | 5% | 15% |

**3. कच्चा माल आणि देशांतर्गत उत्पादकांद्वारे वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवरील सीमा शुल्कात बदल, ज्यामुळे इनपुट्स ची किंमत कमी होणार आणि इन्व्हर्टड ड्युटी संरचनेत सुधारणा होऊ शकेल:**

| **अनुक्रम** | **इनपुट्स, कच्चा माल (विविध क्षेत्रांसाठी)** | **विशिष्ट घटक (वस्तू)** | **शुल्क दर** | |
|---|---|---|---|---|
| | | | **पासून** | **ते** |
| 1. | **पेट्रोकेमिकल उद्योग** | नाफ्था | 4% | 2.5% |
| | **वस्त्रोद्योग** | कॅप्रोलैक्त | 7.5% | 5% |
| | | नायलॉन चिप्स | 7.5% | 5% |
| | | नायलॉन धागे आणि कापड | 7.5% | 5% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | **लोह आणि बिगर-लोह धातू** | पोलाद आणि स्टील मेल्टिंग स्क्रेप या स्टेनलेस स्टील स्क्रेपही समाविष्ट (31.3. 2022) | 2.5% | Nil |
| | | बिगर अलॉय स्टीलची प्राथमिक/सेमी फिनिश्ड उत्पादने | 10% | 7.5% |
| | | बिगर अलॉय आणि अलॉय स्टीलची फ्लाट उत्पादने | 10%/ 12.5% | 7.5% |
| | | अलॉय, बिगर अलॉय आणि स्टेनलेस स्टीलची लॉग उत्पादने | 10% | 7.5% |
| | | CRGO स्टील च्या उत्पादनासाठी वापरला जाणारा कच्चा माल | 2.5% | Nil |
| | | तांबे स्क्रैप | 5% | 2.5% |
| 6. | **विमान वाहतूक क्षेत्र** | संरक्षण मंत्रालयाच्या सार्वजनिक कंपन्यांकडून उत्पादन केल्या जाणाऱ्या विमानांचे सुटे भाग, यात इंजिन आणि इतर साहित्याचा समावेश | 2.5% | 0% |
| 7. | **मौल्यवान धातू** | सोने आणि चांदी* | 12.5% | 7.5% * |
| | | सोने डोरे बार* | 11.85% | 6.9% * |
| | | चांदी डोरे बार* | 11% | 6.1% * |
| | | प्लाटीनम, पैलीडम इत्यादी | 12.5% | 10% |
| | | सोने/चांदी फाइंडिंग्ज | 20% | 10% |
| | | मौल्यवान धातूंचे अवशेष आणि स्क्रैप | 12.5% | 10% |
| | | स्पेंट कॅटेलिस्ट किंवा मौल्यवान धातू युक्त राख | 11.85% | 9.2% |
| | | मौल्यवान धातू नाणी | 12.5% | 10% |
| 8 | **पशुपालन** | फीड अद्दीतीव्ह किंवा प्री मिक्स | 20% | 15% |

**या उत्पादनांवर 2.5 टक्के कृषी पायाभूत आणि विकास उपकरही लागू आहे.*

***4.*** खालील वस्तूंवरील बीसीडी दर कमी करण्यात आले असून त्यांच्यावर कृषी पायाभूत आणि विकास उपकर लावण्यात आला आहे. त्यामुळे, सर्वसामान्य ग्राहकांना मिळणाऱ्या किमतीत काहीही वाढ झालेली नाही. या सर्व वस्तूंवरील सुधारित मूलभूत सीमाशुल्क दर खालीलप्रमाणे आहेत:

| **वस्तू/माल** | **सुधारित मूलभूत सीमाशुल्क दर*** |
|---|---|

| | |
|---|---|
| सफरचंद | 15% |
| अल्कोहोलयुक्त शीतपेये, -प्रकरण 22 मध्ये समाविष्ट | 50% |
| कच्चे खाद्यतेल (पाम, सोयाबीन, सूर्यफूल) | 15% |
| कोळसा, लिग्नाईट, पीट | 1% |
| विशिष्ट खते (युरिया, MoP, DAP) | 0% |
| अमोनियम नायट्रेट | 2.5% |
| वाटाणे, काबुली चणे, बंगाल चणे, मसूर डाळ | 10% |

** या वस्तूंवरील कृषी पायाभूत आणि विकास उपकर बघण्यासाठी भाग C बघावे.*

5. पेट्रोल आणि डिझेलवर कृषी पायाभूत आणि विकास उपकर (एआईडीसी) लागू केल्यानंतर परिणामी, यावरील मूलभूत उत्पादन शुल्क (बीईडी) आणि विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क (एसएईडी) कमी करण्यात आले आहे, जेणेकरून एकूण मिळून ग्राहकांवर कोणताही अतिरिक्त भार पडू नये. परिणामी , अनब्रँडेड पेट्रोल आणि डिझेलला अनुक्रमे 1.4 रु. आणि 1.8 रु. प्रतिलिटर मूलभूत उत्पादन शुल्क लागू असेल .अनब्रँडेड पेट्रोल आणि डिझेलवरील एसएईडी अनुक्रमे 11 रु.आणि 8 रु. प्रतिलिटर करण्यात आला आहे.ब्रँडेड पेट्रोल आणि डिझेलसाठीही याचप्रमाणे बदल करण्यात आले आहेत.या वस्तूंवर लावण्यात आलेल्या कृषी पायाभूत आणि विकास उपकर दरासाठी भाग C पाहा.

## 6. सवलती तर्कसंगत करणे

| अनुक्र. | वस्तूंची श्रेणी | विशिष्ट वस्तू | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| 1. | **खनिजे** | नैसर्गीक बोरेट्स आणि त्याचे कंसन्ट्रेट्स | Nil/ 5% | 2.5% |
| 2. | **रसायने** | स्पॅनडेक्स यार्न तयार करण्यासाठी मिथाइल डायफिनाईल आयसोसायनेट (एमडीआई) | Nil | 7.5% |
| 3. | **हस्तशिल्प, वस्त्र आणि चामड्याच्या निर्यातीला आवश्यक साहित्याला** | गेल्या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या निर्यातीच्या आधारावर मोती, गोंद, वेनीर, पॉलिश, हुक्स ,रिव्हेट्स , बटन, बॅगजेस, शाटॉन, बीडस , शिलाईचा धागा | Nil | लागू दर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **शुल्कमुक्त परवानगी** | आदी. या वस्तूंच्या शुल्कमुक्त आयातीची अनुमती हस्तशिल्प, वस्त्र आणि चामड्याच्या निर्यातदारांना देण्यात आली आहे.<br><br>या सवलतींचा लाभ घेण्यासाठी 31.03.2021 ही अंतिम तारीख देण्यात आली आहे. | | |

## 7. रद्दीकरण / तात्पुरते निरस्तीकरण/ प्रतिमूल्यावरचे शुल्क आणि प्रतिशुल्क बंद करणे

| अनुक्रम | विशिष्ट वस्तू |
|---|---|
| 1. | खालील आयातीवर 2.2.2021 पासून 30.09.2021 पर्यंत या कालावधीसाठी प्रतिमूल्यावर शुल्क तात्पुरते रद्द केले जात आहे-<br><br>(a) चीन गणराज्याकडून मूलतः उत्पादित किंवा तिथून निर्यात केलेले नियमित मिश्रधातू पोलादा पासून तयार केलेले सरळ लांबीचे दांडे आणि गज, संदर्भ अधिसूचना क्र. 54/2018-सीमाशुल्क (ADD) दिनांक 18.10.2018 अंतर्गत लागू करण्यात आलेले;<br><br>(b) ब्राझील, चीन गणराज्य आणि जर्मनीत मूलतः उत्पादित किंवा तिथून निर्यात केलेले कोबाल्ट नसलेल्या श्रेणीतील शीघ्रगती पोलाद, संदर्भ अधिसूचना क्रमांक 38/2019-सीमाशुल्क (एडीडी) दिनांक 25.09.2019 अंतर्गत लागू करण्यात आलेले;<br><br>(c) चीन गणराज्य, व्हिएतनाम आणि कोरिया आरपी इथे मूलतः उत्पादित किंवा तिथून निर्यात केलेले मिश्रधातू अल्युमिनियम किंवा जस्ताचा पत्रा आणि मुलामा असलेले पोलादाचे सपाट गुंडाळलेले ( पत्रे, पाईप आणि गरज) यांचे उत्पादन (स्टील फ्लॅट रोल्ड प्रॉडक्ट ऑफ स्टील) ,संदर्भ अधिसूचना क्रमांक 16/2020-सीमाशुल्क (एडीडी) दिनांक |

| | |
|---|---|
| | 23.06.2020.अंतर्गत लागू करण्यात आलेले. |
| 2. | चीन गणराज्यात मूलतः उत्पादित किंवा तिथून निर्यात केलेल्या रोल्ड आणि कोल्ड रोल्ड स्टेनलेस स्टील फ्लॅट उत्पादनांच्या आयातीवरील ,संदर्भ अधिसूचना क्र. 1/2017-सीमाशुल्क (सिव्हीडी)) दिनांक 7.09.2017.अंतर्गत लागू करण्यात आलेले प्रतिशुल्क 2.2.2021 ते 30.09.2021 या कालावधीसाठी तात्पुरते रद्द करण्यात येत आहे. |
| 3. | इंडोनेशियात मूलतः उत्पादित किंवा तिथून निर्यात केलेल्या स्टेनलेस स्टीलच्या सपाट उत्पादनांच्या आयातीवरील, संदर्भ अधिसूचना क्र. 2/2020-सीमाशुल्क (सिव्हीडी) दिनांक 9.10.2020 अंतर्गत लागू प्रतिशुल्क रद्द केले जात आहे. |
| 4. | समाप्त पुनरावलोकनामध्ये, चीन प्रजासत्ताक, कोरिया प्रजासत्ताक, युरोपीय संघ, दक्षिण आफ्रिका, तैवान, थायलंड, युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेत मूलतः उत्पादित किंवा तिथून निर्यात केलेले बिगर वास्तविक उपयोगासाठी<br>600 मि. मी. ते 1250 मि. मी. आणि 1250 मी. हुन अधिक रुंदीच्या स्टेनलेस स्टीलच्या कोल्ड गेल्ड फ्लॅट उत्पादनांवर ,संदर्भ अधिसूचना क्र.61/2015-सीमाशुल्क (एडीडी) दिनांक 11 डिसेंबर 2015 आणि 52/2017-सीमाशुल्क (एडीडी) दिनांक 24 ऑक्टोबर 2017 अंतर्गत लागू करण्यात प्रतिमूल्यावरती शुल्क , मुदत संपल्यावर बंद करण्यात आले आहे. |

## 8. अन्य संकीर्ण बदल

| अनुक्रम | वस्तूंची श्रेणी | विशिष्ट वस्तू |
|---|---|---|
| 1. | **विविध** | वेशभूषा आणि चित्रपट निर्मात्यांना लागणाऱ्या साहित्याच्या तात्पुरत्या आयातीत सूट. |

| | | |
|---|---|---|
| | | सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प स्थापन करण्यासाठीची यंत्रसामग्री, साधने, उपकरणे, घटक,साहाय्यकारी उपकरणे या वस्तूंवरील सूट रद्द केली जात आहे. [अधिसूचना क्र. 1/2011-सीमाशुल्क] |
| 2. | प्रकल्प आयात | सर्व अतिवेगवान रेल्वे प्रकल्पांना लाभ दिला जात आहे. |
| 3. | माहिती तंत्रज्ञान / इलेक्ट्रॉनिक्स | संगणाकांसाठी वापरात येणाऱ्या प्रिंटरसाठी लागणारे इंक कार्टरिजेस, रिबनअसेंबली , रिबन गियर असेंबली या वस्तूंच्या मूलभूत सीमा शुल्कातील ( बीसीडी) सवलतीचा दर मागे घेण्यात येत आहे. |
| 4. | खेळणी | सूट संबंधित अधिसूचनेनुसार , इलेक्ट्रॉनिक खेळण्याच्या विविध भागांवर सवलतीच्या दरात मूलभूत सीमाशुल्क ( बीसीडी) लागू आहे, विद्यमान नोंदण्या एकाच नोंदीत समाविष्ट करण्यात येत आहेत, आणि नव्या नोंदींसाठी 15 टक्के सुधारित बीसीडी दर विहित करण्यात येत आहे. |
| 3. | अंतिम वापर आधारित सवलतीमध्ये विद्यमान विविध अटींच्या बदल्यात आयसीजीआची अट असेल. | सीमाशुल्क सवलतींमध्ये असलेल्या जाचक अटी ,आता सवलतीच्या दरावर मालाची आयात (आयसीजीआर)चे पालन केले जाईल या अपेक्षेने पुनर्स्थापित केल्या जात आहेत.हे अंतिम वापर आधारित सवलतीमध्ये अनुपालन अपेक्षेला सुलभ आणि प्रमाणित करेल. |

**C. निर्दिष्ट केलेल्या वस्तूंवर कृषी पायाभूत सुविधा विकास उपकर लागू करणे [w.e.f. 2.2.2021]**

कृषी पायाभूत सुविधा व विकास उपकर प्रस्तावित आहे अशा निर्दिष्ट वस्तू, खाली खालीलप्रमाणे:

**(A) सीमाशुल्क संबंधित**

| वस्तू | प्रस्तावित उपकर |
|---|---|
| सोने,चांदी, डोअर बार्स | 2.5% |
| अल्कोहोलयुक्त पेय पदार्थ (भाग 12 अंतर्गत येणारे) | 100% |
| क्रूड पाम तेल | 17.5% |
| क्रूड सोयाबीन आणि सूर्यफूल तेल | 20% |
| सफरचंद | 35% |
| कोळसा लिग्नाइट आणि पीट | 1.5% |
| विशिष्ट खते (युरीया इत्यादी) | 5% |
| मटार | 40% |
| काबुली चणे | 30% |
| हरभरे /चणे | 50% |
| मसूर | 20% |
| कापूस (पिंजल्याशिवाय) | 5% |

या वस्तूंवरील मूलभूत सीमाशुल्क दरासाठी भाग B चा संदर्भ घ्या. एकूणच, यापैकी बहुतेक वस्तूंसाठी ग्राहकांवर अतिरिक्त भार पडणार नाही.

(B) **उत्पादन शुल्क संबंधित:**

पेट्रोलवर 2.5 रुपये प्रतिलिटर आणि डिझेलवर 4 रुपये प्रतिलिटर कृषी पायाभूत सुविधा आणि विकास उपकर एआईडीसी लागू करण्यात आला आहे. इतर शुल्क आणि उपकरांसाठी सुधारित एआईडीसी लागू करण्याच्या परिणामी, भाग B पहा. एकूणच, ग्राहकांवर अतिरिक्त भार पडणार नाही.

**E. समाजकल्याण अधिभार (SWS)**

| | |
|---|---|
| 1. | a. अधिसूचना क्रमांक. 12/2018-सीमाशुल्क दिनांक 2.2.2018 रद्द करण्यात येत आहे, कारण सर्व वस्तूंसाठी केवळ एकच 10 % एसडब्लूएस दर राहील.<br><br>b. सोने आणि चांदीसाठी कृषी पायाभूत सुविधा विकास निधी उपकरावर एसडब्लूएस मध्ये सूट दिली जाते आहे. |

**F. केंद्रीय उत्पादन शुल्कातील विविध बदल:**

| | | |
|---|---|---|
| 1. | मिश्र इंधन:<br>एम-15 पेट्रोल आणि ई-20 पेट्रोल | जर ही मिश्र इंधनं शुल्क दिलेल्या कच्च्या मालापासून तयार केलेली असल्यास अन्य मिश्र इंधनं /म्हणजेच ई-5 आणि ई - 10) च्या धर्तीवर उपकर आणि अधिभारांमध्ये सूट |

**G. केंद्रीय वस्तू आणि सेवा कर ( GST) कायदा 2017 (सीजीएसटी कायदा ) आणि एकात्मिक वस्तू आणि सेवा कर (GST) कायदा ,2017 ( आयजीएसटी कायदा ) तरतुदींमध्ये वैधानिक बदल:**

वस्तू आणि सेवा कर परिषदेद्वारे करण्यात आलेल्या शिफारशींच्या आधारावर सीजीएसटी कायदा आणि आयजीएसटी कायद्यात बदल झाले आहे. अधिसूचित केलेल्या तारखेपासूनच हे बदल लागू होतील.शक्य असेल तिथे, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या विधीमंडळांनी स्वतंत्ररित्या संमत केलेल्या या कायद्यातील सुसंगत सुधारणांसह.

यासाठी उपाययोजनांचा समावेश

(i) करदात्यांना सुविधा प्रदान करणे , जसे की, वार्षिक लेखापरीक्षण , हिशेब मेळ विवरणपत्राची अनिवार्य आवश्यकता काढून टाकणे , स्वप्रमाण आधारावर वार्षिक विवरणपत्र भरणे आणि 1 जुलै 2017 पासून निव्वळ रोख दायित्वावर व्याज आकारणी.

(ii) अनुपालन सुधारणे , जसे की पुरावठादाराने बाह्य पुरवठ्याच्या माध्यमातून विवारणपत्रात तपशील जाहीर केल्यानंतरच विशिष्ट कर्ज पत देणे, एका कालावधीसाठी तात्पुरत्या संलग्नतेची वैधता ,केवळ विशिष्ट प्रकरणांमध्ये आयजीएसटीच्या देयकावर शून्य - रेटिंग आणि त्याला परदेशी पैसे पाठवण्याशी जोडणे

(iii) जप्ती आणि जप्तीशी संबंधित काही इतर बदल करणे ,लादलेल्या दंडांपैकी पंचवीस टक्के बरोबरीने रक्कम भरल्यानंतरच अपील दाखल करणे

H. किरकोळ स्वरूपाचे काही अन्य बदल आहेत .अर्थसंकल्पातील प्रस्ताव ,स्पष्टीकरणात्मक निवेदन,आणि अर्थ संकल्पातील इतर संबंधित कागदपत्रांचा अधिक तपशील संदर्भित केला जाऊ शकतो.